शुक्रवार, १९ जानेवारी २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - १५४

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 19 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-154 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05




# अयोध्येचा राजा गर्भगृहात विराजमान

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या :** अयोध्येत राम मंदिराच्या उद्घाटनाचा विधी सुरू आहे. 22 जानेवारीला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी शास्त्रानुसार एकामागून एक पूजा केली जात आहे. याच अनुषंगाने गुरुवारी नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिराच्या गाभाऱ्यात श्री रामलालाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गुरुवारी सायंकाळी रामललाच्या मूर्तीची गर्भगृहात प्रतिष्ठापना करून हा शुभ सोहळा संपन्न झाला. एक प्रकारे, शतकांनंतर, रामललाला त्यांच्या जन्मस्थानी विराजमान केले गेले आहे, आता 22 जानेवारीला अभिषेक होणार आहे.

प्राणप्रतिष्ठेनंतर रामललाची दिव्य मूर्ती पाहता येईल. गुरुवारी रामाची मूर्ती गर्भगृहाच्या आसनावर ठेवण्यात आली होती. रामललाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी एकूण चार तासांपेक्षा जास्त वेळ लागला. भगवान रामाची ही मूर्ती मंत्रोच्चार आणि पूजाविधीसह पीठावर ठेवली होती. यावेळी शिल्पकार योगीराज यांच्यासह अनेक संत उपस्थित होते. तथापि, अंतिम अभिषेक 22 जानेवारी रोजी होणार आहे. गुरुवारी गाभाऱ्यात रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली, तेव्हा पूर्ण झाकलेली रामलल्लाची मूर्ती आता गाभाऱ्यावर विराजमान झाली आहे. दुसरीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी प्राण प्रतिष्ठापणेपर्यंत विशेष अनुष्ठाण करत आहेत. त्यांचा 11 दिवसांचा विधी सुरू झालेला आहे.

**अर्ध्या दिवसाची सुट्टी :** केंद्र सरकारने अयोध्येतील राम मंदिरात 22 जानेवारीला होत असलेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने अर्ध्या दिवसाची सुट्टी जाहीर केली आहे. केंद्र सरकारच्या कार्मिक मंत्रालयाने ही ऑर्डर काढली आहे. ऑफिस मेमोरँडमनुसार, कर्मचाऱ्यांच्या भावना आणि विनंती लक्षात घेऊन, केंद्र सरकारने सर्व केंद्र सरकारी कार्यालये, केंद्रीय संस्था आणि केंद्रीय औद्योगिक येथे अर्ध्या दिवसाची सुट्टी जाहीर केली आहे. 22 जानेवारी 2024 रोजी दुपारी 2 :30 वाजेपर्यंत आस्थापनेला सुट्टी असेल. देशभरात २२ जानेवारीला दिवाळी साजरी केली जाणार आहे.



## निवडणुकीतील फायद्यासाठी भाजपकडून राममंदिर उद्घाटनाचा इव्हेंट : प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** भारतीय जनता पक्षाकडून अयोध्येतील राम मंदिर उद्घाटनाचे भांडवल केवळ राजकीय फायदा उठवण्यासाठी केले जात आहे. मंदीर अजून अर्धवट असून अर्धवट मंदिरात प्राणप्रतिष्ठा करणे अयोग्य आहे हे शंकराचार्यांनी जाहीरपणे सांगितले आहे परंतु भाजपाला घाई झाली असून निवडणुकीतील फायद्यासाठी राम मंदिर उद्घाटनाचा इव्हेंट केला जात आहे, असा आरोप प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी प्रदेश काँग्रेसच्या आढावा बैठकीची सुरुवात अमरावतीतून झाली. यावेळी रमेश चेन्नीथला प्रसार माध्यमांशी संवाद साधत होते, ते पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्ष राम मंदिराच्या विरोधात नाही, सर्वांना आपले धार्मिक स्वातंत्र्य आहे. काँग्रेस पक्षातील अनेक नेतेही अयोध्येला जाऊन आले आहेत. मकर संक्रांतीच्या दिवशी काँग्रेस नेते व उत्तर प्रदेशचे प्रभारी अविनाश पांडे यांनी सहकाऱ्यांसह अयोध्येला भेट देऊन रामलल्लाचे दर्शन घेतले. अयोध्येला ज्यांना जायचे आहे त्याला विरोध केलेला नाही. भारतीय जनता पक्ष व नरेंद्र मोदी हे राजकीय फायद्यासाठी मंदिर उद्घाटनाचा इव्हेंट करत आहेत ते चुकीचे आहे आणि जनतेला ते माहीत आहे.

भारत जोडो न्याय यात्रेविषयी बोलताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, राहुल गांधी यांनी मणिपूर ते मुंबई भारत जोडो न्याय यात्रा सुरु केली असून या न्याय यात्रेला मोठे जनसमर्थन मिळत आहे. भारत जोडो न्याय यात्रा ही निवडणूक यात्रा नाही तर देशातील सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी आहे. यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी भारत जोडण्याचे काम करत आहेत, ही यात्रा देशासाठी आहे. पत्रकारांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, महाराष्ट्र काँग्रेस सक्षम असून सर्व नेते एकत्र आहेत कोणाही पक्ष सोडून जाणार नाही. भारतीय जनता पक्ष अफवा पसरवून दिशाभूल करत आहे. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे व प्रदेश कार्याध्यक्ष आ. प्रणिती शिंदे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केलेली आहे.

विभागीय बैठकीमध्ये संघटनात्मक तयारीचा आढावा घेण्यात आला. प्रदेश काँग्रेस कमिटीने दोन महिन्यापूर्वी जिल्हा काँग्रेस कमिट्यांना कार्यक्रम दिला होता त्याचा आढावाही घेतला जात आहे. आज अमरातीमध्ये बैठक झाली असून शेवटची बैठक मराठवाडा विभागात २९ तारखेला लातूरमध्ये होत आहे.


## सुविधा पुरवण्यापेक्षा जाहिरात बाजींवर कोट्यवधींचा खर्च

### मुंबई प्रदेश अध्यक्षा राखीताई जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईकरांच्या सोयी सुविधीसाठी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी मुंबई महानगरपालिकेच्या एफडी चा वापर करण्यात येत होता मात्र आता महापालिकेच्या प्रशासनाकडून जाहिरात बाजीवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येत आहे. मुंबई महानगर पालिकेच्या पालिकेचे आयुक्त तथा प्रशासकांनी दोन वर्षांपासून मुंबईकरांसाठी एक वेगळाच पायंडा घातलेला आहे, त्यामुळे मुंबईकरांच्या सोयी- सुविधा अबाधित राहतील की नाही? असा प्रश्न निर्माण झालेला आहे असे मुंबई प्रदेश अध्यक्ष राखीताई जाधव यांनी आयोजित पत्रकार परिषदेमधून प्रश्न विचारला आहे. जाधव म्हणाल्या की, मुंबई महानगरपालिकेच्या ज्या ठेवी आहेत. त्या माध्यमातून या शहराचे जे विकासाच्या दृष्टिकोनातून जे प्रकल्प राबवल्यात जात आहे त्या कामाकरिता खर्च केला जात होता. त्याचबरोबर हे प्रकल्पाच्या व्यतिरिक्त महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी पगारासाठी वापरण्यात येत होता. मात्र गेल्या दोन वर्षांपासून हा निधी सुशोभीकरणाच्या नावावर खर्च करण्यासाठी हे प्रशासकीय अधिकारी आग्रही आहे. तसेच मोठ्या प्रमाणात जाहिराती वर खर्च करण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीतून किंवा महानगरपालिकेच्या एफडीस तोडून हा संपूर्ण खर्च करण्याचे निर्देश राज्य सरकारच्या माध्यमातून महापालिका प्रशासनाला देण्यात येत आहे. असे राखीताई जाधव यांनी म्हटले आहे. मुंबई महानगर पालिकेच्या ठेवीचा वापर विविध प्रकल्प राबवण्यासाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे पगार काढण्यासाठी वापरले जायचे, परंतु आता वायफळ खर्च केला जात आहे. मुंबई महानगर पालिकेच्या ठेवीतील कोट्यावधी रुपये सुशोभीकरणासाठी, जी- २० च्या कामकाजासाठी, ट्रान्स हार्बर सेतूच्या जाहिरातबाजीसाठी वापरण्याचे निर्देश प्रशासनाकडून व राज्य सरकारकडून देण्यात येत आहे हे मुंबईकरांच्या हिताचे नाही.

मुंबई महानगर पालिकेत पुढील काही वर्षे जर असेच कामकाज सुरू राहिले तर कर्मचाऱ्यांचे पगार देणेदेखील कठीण होईल अशी भीती आहे, याची राज्यकर्त्यांनी जबाबदारी घ्यायला हवी. मुंबई महानगरपालिका आशिया खंडातील सर्वात मोठी महापालिका म्हणून नावलौकिक आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ते चाळीस दिवस. ..

आधुनिक केसरी

अखेर झाडावर अडकलेले विमान शोधपथकाला सापडले. विमान अपघातात ठार झालेल्या व्यक्तींचे मृतदेह मिळाले. पण ती चार चिमुकली बालके मात्र कुठे आढळत नव्हती. सगळ्यांना चिंता आणि उत्सुकता होती ती त्यांची. हे बचावकार्य अक्षरशः चाळीस दिवस चालू होते. अतिशय घनदाट असे अमेझॉनचे जंगल ही माणसे पिंजून काढत होती. जमिनीवर म्हणजेच प्रत्यक्ष जंगलात जाऊन शोध घेणारी बचावपथके होती तशीच हेलिकॉप्टरचा वापर करून आकाशातूनही शोध घेणे सुरु होते. इच्छा असली की मार्ग दिसतोच. या शोध पथकाने मुलांच्या आजीकडे जाऊन तिच्या आवाजात आणि त्या मुलांच्या स्थानिक भाषेत एक ऑडिओ मेसेज रेकॉर्ड केला. त्या ऑडिओत आजी म्हणत होती, ' बाळांनो, आहेत तिथेच थांबा. आम्ही तुमचा शोध घेतोय. तुम्ही आम्हाला हवे आहात. आम्ही तुमची वाट पाहतोय.' हा आजीच्या आवाजातील संदेश ती शोधपथके मुलांसाठी मोठ्या आवाजात प्रक्षेपित करत होती. ती मुले एकाच ठिकाणी थांबावी आणि त्यांना शोधणे सोपे जावे हा उद्देश होता. त्या मुलांना खायला मिळावं यासाठी हेलिकॉप्टरमधून खाद्यपदार्थांची पाकिटे टाकण्यात येत होती. इकडे या बालकांचा आयुष्याशी लढा सुरु होता. तशी तेरा वर्षांची लेस्ली लहानच ! पण आता ती सगळ्या भावंडांमध्ये मोठी होती. आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी नियतीनं तिच्यावरच टाकली होती. लेस्लीने धीर एकवटला आणि निश्चय केला की या परिस्थितीतही आपण आपल्या भावंडाना वाचवायचं. जगायचं आणि जगवायचं तर खाण्यासाठी काहीतरी व्यवस्था करणं भागच होती. सुरुवातीला विमानातून खाली पडलेल्या अन्नावर त्यांनी कसेबसे दिवस काढले. पाण्याचा शोध घेतला. जंगलातील फळे खाणे तसे धोक्याचे होते कारण काही फळे विषारीही असतात. पण लेस्ली जंगलकन्या होती. आदिवासी जमातीतील होती.





## आनंदी पहाट

# आवडलेले निवडता येतेच असे नाही

आधुनिक केसरी

आपण सहजासहजी आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यांमध्ये बदल करू इच्छित नसतो. आपल्या जीवनशैलीत बदल करण्यासाठी आपलं मन तयार नसतं. दैनंदिन कार्यामध्ये थोडासा बदल करून बघितला तर, नक्कीच एका वेगळ्या वातावरणाची आपल्याला प्रचीती येऊ शकते. प्रॉब्लेम प्रत्येकालाच असतात तसंच प्रत्येक प्रोब्लेमला उत्तरही असतंच. ते सोडवायला कधी वेळ हवा असतो, कधी पैसा, तर कधी आपल्या हक्काची माणसं गरजेची असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

यांच्या व्यतिरिक्त आणि त्याच्या पलीकडचा प्रोब्लेम अस्तित्वातच नसतो. प्रत्येक ठिकाणी जाण्यासाठी आपलं मन धावत असतं. हे मनाचं प्रकरण खरंच खूप छान असतं. जागा न सोडता ते हजारो मैल भटकत असतं आणि सगळ्यांना भेटत असतं. पण शरीर त्यांपैकी एकदोन ठिकाणीच जाऊ शकतं. आवडलेलं आणि निवडलेलं यांची जेव्हा सांगड घालता येत नाही तेव्हा आयुष्यात उरते ती फक्त तडजोड, कारण आवडलेलं कधी आपल्याला विसरता येत नाही आणि निवडलेलं मनापासून स्वीकारता येत नाही. परंतू निवडलेलंच जेव्हा आवडायला लागतं तेव्हा तडजोडीचा प्रश्नच उरत नाही. शब्दांचा व्याकरणातला अर्थ आणि स्थान हे परीक्षा देताना समजतं आणि त्याच शब्दांचं जीवनाशी काय नातं असतं त्याचा अर्थ जगण्यापलीकडचं जीवन जगताना समजतो. परीक्षेचा हॉल सोडला कि परीक्षेचं ओझं झटकता येतं, कारण पदवीपुरातच त्या हॉलशी संबंध असतो. पण जीवन जगताना जेव्हा शब्द झटकता येत नाहीत, तेव्हाच त्यांचा खरा अर्थ समजतो. ह्या बाबींची जाणीव होणं म्हणजेच जगण्यापलीकडचं जीवन उपभोगणे होय. ती अनुभूती केवळ अधिकारातून प्राप्त होत असल्याची जाणीव करून घेणं जरुरीचं असतं. म्हणूनच अधिकाराशिवाय अधिकारीही त्याचं कर्तुत्व सिद्ध करून दाखवू शकत नाही.



आधुनिक केसरी

## गोविंदुची खुण | हरिनामी ||

नामाच्या गजरी | रमले हे मन ||
अखंड भजन | विठ्ठलाचे ||२||
जडला जीवाला | छंद भजनाचा ||
आत्म चिंतनाचा | ध्यास लागे ||२||
नको आणिकांचा | विचार अंतरी ||
गाथ-ज्ञानेश्वरी | श्वास झाला ||३||
मानस वारीचा | झालो वारकरी ||
देह हा पंढरी | जन्म झाला ||४||
काय मज ठावे | सगुण निर्गुण ||
गोविंदुची खुण | हरिनामी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

किंत बैसला मनां । येके ठाई पडेना ।
म्हणोनियां पांचा जणा । मेळविलें ॥१७॥
पांच जण वांटे करिती । तों ते पुत्र नायेकती ।
निवाडा नव्हेचि अंतीं- । भांडण लागलें ॥१८॥
बापलेकां भांडण जालें । लेंकीं बापास मारिलें ।
तंव ते मातेनें घेतलें । शंखतीर्थ ॥१९॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

हानि लाभ सुख दुखन में, ह
र्ष शोक नहिं सन्त ।
चिन्ता चाह न मन करें, अभय अशंक
अनन्त ।।४१।।(स्वर्वेद प्रथम मण्डल
अष्टम अध्याय) ०१/०८/४१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : कुठाल्याही वस्तूच्या हानी-लाभात सुख-दुःख आणि हर्ष-शोक संतांना होत नाही. संत ना कुठल्या वस्तूची इच्छा करतात, ना चिंता, विचार करतात. ते निर्भय आणि निःसंकोच होऊन अनंत महाप्रभूच्या भक्तीत रात्रंदिवस निमग्न असतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

"यस्त अमतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः | अविज्ञातं विजानतां विज्ञातम् अविजानताम् || बघा संस्कृतला देवभाषा का म्हणतात? हे या एका वाक्यातून लक्षात येईल. याचा मराठी अर्थ पुढील प्रमाणे. ज्या आत्मज्ञानी पुरूषास "आत्मतत्त्व कळत नाही" असे त्याला वाटते पण ते त्याला कळलेले असते. खोट्या बढाया मारणारे दांभिकतेचे सोंग घेतलेले तो म्हणतो "मला आत्मतत्त्व कळले" वास्तविक त्याला ते कळलेले नसते. म्हणजेच या वाक्याचा सरळ अर्थ घेतला तर त्यात परस्पर विरोधी दिसतो. ज्ञानी पुरूष स्वानुभव सांगण्यासाठी अज्ञानाची भाषा वापरतो हे खरे,पण त्याचा बोलण्याचा अर्थ अभ्यास पूर्ण असतो. ब्रम्हनिरूपण या दुसऱ्या समासात शेवटाकडे जाताना समर्थांनी आपल्याला फार फार मोलाचा सल्ला दिला होता.तो म्हणजे "सर्व काही करून काहीच न करावे" आता काही लोक इथे शंका घेतील की हे कसले आले तुमचे ब्रम्हज्ञान? सगळे करून अकर्ता आणि सगळे भोगून अभोक्ता रहाणे कसे शक्य होईल ? एकवेळ समजू शकतो की माणूस कर्ता व भोक्ता राहिलं.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी


गोरक्षानेंगुरूच्या बोलण्याचा तो झोंक पाहिला, तेव्हा आजपर्यंत सुवर्णाची वीट कोणत्या कारणास्तव जपून ठेविली होती ते मला सांगावे, असा त्यानें आग्रह धरिला. तेव्हा मच्छिंद्रनाथ म्हणाला की, माझ्या मनात अशी इच्छा होती की, आपल्या देशी गेल्यावर साधुसंतांची पूजा करून एक मोठी समाराधना घालावी. ते ऐकून तुमचा हा हेतु मी पुरवितो, म्हणून गोरक्षाने त्यास सांगितले. मग गोरक्षाने गंधर्वास्त्रमंत्र म्हणून भस्माची एक चिमटी स्वर्गाकडे फेकली; त्याबरोबर चित्रसेन गंधर्व येऊन नाथास वंदन करून काय आज्ञा आहे म्हणून विचारू लागला. तेव्हा गोरक्षाने सांगितले की, आणखी काही गंधर्वांस बोलाव आणि त्यांना चौफेर पाठवून बैरागी, संन्यासी, जपी, तपी, संतसाधु, देव, गंधर्व, दान असे बोलून

# ज्या घरात शांति । त्या घरात भगवंताची वस्ती ॥

आधुनिक केसरी

गृहस्थाश्रमासारखा आश्रम । दुसरा नाही खास ॥ नीतिधर्माचे रक्षण । यासाठीच विवाहाचे कारण ॥ ज्या घरात राहते शांति । त्या घरात भगवंताची वस्ती ॥ कृतीवर मनुष्याची परीक्षा । जैसी वासावर पदार्थाची परीक्षा ॥ कोणाचा न करावा घात । ऐसे वागावे जगात । आपले आपण करून घ्यावे हित । त्यालाच म्हणतात संभावित ॥ न कधी व्हावे आपण निराश । व्यवहार हात देईल खास ॥ व्यवहारातील करावा प्रयत्न । प्रपंचात न पडू द्यावे न्यून । रोगाची भीति । न ठेवावी चित्ती ॥ रोगाला उपचार करावे जरी बहुत । तरी कष्टी न होऊ द्यावे चित्त ॥

आप्त इष्ट सखे सज्जन । यांचे राखावे समाधान । परि न व्हावे त्यांचे अधीन ॥ सर्वांशी राहावे प्रेमाने । चित्त दुश्चित्त न व्हावे कशाने ॥ आपलेपणा ठेवला जेथे । प्रेम लागत असे तेथे ॥ ज्या घरात स्वार्थाचे मान बळावले । तेथे समाधानाचे मान कमी झाले ॥ मन राखता आले । तरच प्रत्येकाला सुख लागले ॥ सुखाने नांदावे नवरा-बायकोंनी ।



राम आणावा ध्यानी ॥ दोघांनी रहावे प्रेमाने । सदा वागावे आनंदाने ॥ एकमेकांनी दुसऱ्यास दुःख होईल असे न करावे । काळजी वाटेल असे न वागावे ॥ घरातील माणूस मार्गाने चुकले । त्यास प्रायश्चित्त हवे खरे । पण ते नसावे जन्माचे । तेवढ्यापुरते असावे साचे ॥ एखाद्याचे हातून करू नये असे कर्म झाले । तरी त्याला सुधारण्याच्या मार्गाने सर्वांनी वागावे ॥ आचरण शुद्ध असावे । एकपत्नीव्रत सांभाळावे । प्राण गेला तरी परद्वार करू नये ॥ कोणतेही व्यसन करू नये । नीच संगत धरू नये ॥ भलते काम करू नये ॥ गृहछिद्र कोणा सांगू नये । आपला बोज आपण घालवू नये । विश्वासघात कोणाचा करू नये ॥ परदुःखे हसू नये । देहदुःखे त्रासू नये । केला उपकार बोलूं नये ॥ मुलाबाळांस सांभाळून राहावे । प्रपंचात कधी उदास न व्हावे । प्रेमाने वागावे सर्वांशी । सुख राहे निःस्वार्थापाशी ॥ आईवडिलांची आज्ञा पाळावी । चांगल्याची संगत धरावी । अभ्यासांत लक्ष ठेवून राहावे । भगवंताचे नामस्मरण करावे ॥ नामापरते न माना दुजे साधन । जैसे पतिव्रतेस पति प्रमाण ॥ नामापरते न मानावे सत्य । ज्याने राम होईल अंकित ॥ हेच साधुसंतांचे बोल । कोणीही न मानावे फोल ॥
९०. कोणतेही काम करीत असता राखावी मनाची शांति ॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १९ जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari



# वाईन शॉपवर हल्लाबोल

## आंनद लोंढे यांच्यासहित अनेकांवर गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या अनेक दिवसापासून चर्चित असलेल्या शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या मागील विनोद वाईन शॉप विषयाचा प्रश्न चिघळला आहे यासाठी अनेक दिवसापासून आझाद समाज पार्टीचे आनंद लोंढे यांनी विनोद वाईन शॉप फोडण्याचा विडा उचलला होता त्याचप्रमाणे आज सर्व समाज बांधव एकत्रित येऊन या ठिकाणी विनोद वाईन शॉप फोडण्याचा प्रयत्न झाला तेथील शॉप चे फलक फोडून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यासाठी जात असताना पोलिसांनी तात्काळ त्यांना अटक केले व संपूर्ण परिसरात अशांतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या ठिकाणी शहर पोलीस स्टेशनचे निरीक्षक बदली झाल्यामुळे त्या ठिकाणी आयपीएस अधिकारी ऋषिकेश रेड्डी यांनी तात्काळ धाव घेतली व त्यांनी सांगितले की 23 तारखेला सुनावणी आहे वाईनशॉप ची त्या आधी कायदा हातात घेणे योग्य नव्हते मि कठोर कारवाही करेल महिन्याच्या अखेर वाईन शॉप बंद होणार असे सांगितल्यावर देखील त्यांनी त्या ठिकाणी जाऊन तोडफोड केली कायदा हातात घेऊन खूप मोठी चूक केली आहे असे IPS अधिकारी रेड्डी यांनी ह्या ठिकाणी पत्रकारांशी बोलताना सांगितले त्या ठिकाणी त्यांना सोडवण्यासाठी ॲडव्होकेट विशाल साळवे सहित अनेक वकील उपस्थित होते मा. ऋषिकेश रेड्डी यांनी समाज बांधवांना शांततेचे आवाहन करून आनंद लोंढे व कार्यकत्यांना सोडू असे आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यास सांगितले परंतु आनंद लोंढे यांनी सांगितले की जर 23 तारखे नंतर विनोद वाईन शॉप कायमस्वरूपी बंद न झाल्यास आतून पूर्णपणे फोडले जाईल असे या ठिकाणी सांगण्यात आले.

# शहरी व ग्रामीण भागातही आदिवासींना घरकुल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात उपयोजनेंतर्गत अनुसूचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांसाठी राज्य शासनाच्या बत्तीने शबरी आवास घरकुल योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ केवळ ग्रामीण भागातील आदिवासींना मिळत असल्याने शहरी भागातील आदिवासी घरकुलापासून वंचित होते. आता शहरी भागात वास्तव्यास असलेल्या राज्यभरातील आदिवासी कुटुंबानाही या घरकुल योजनेचा लाभ मिळणार असल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले आहे. राज्यातील अनुसूचित जमातीच्या ज्या लोकांना राहण्यासाठी स्वतःची घरे नाहीत अथवा जे अनुसूचित जमातीचे लोक कुडा मातीच्या घरात, झोपड्यांमध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या निवारात राहतात, अशा अनुसूचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी वैयक्तिक लाभाची शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्यात येते. ही योजना शासन निर्णयानुसार ग्रामीण व शहरी या दोन्ही भागात राबविणे अपेक्षित होते, मात्र ग्रामविकास विभागाच्या 10 फेब्रुवारी 2016 च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष (ग्रामीण गृहनिर्माण) स्थापन करण्यात आला आहे.या कक्षाद्वारे ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व राज्य शासनाच्या विभागामार्फत राबविण्यात येणा-या सर्व ग्रामीण घरकुल कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते, त्यामुळे शहरी भागात शबरी आदिवासी घरकुल योजनेबी अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा नसल्याने शहरी भागातील आदिवासी कुटुंब घरकुलापासून वंचित राहात आहे. ही मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आल्यावर शहरी भागात संबंधित महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत याच्यामार्पत आदिवासी कुटुंबासाठी शबरी घरकुल योजना राबवावी, यासाठी मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. आता शहरी भागातील पात्र आदिवासी लाभाध्यांना शबरी घरकुल योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 11 जानेवारी 2024 रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा, त्याचे स्वतःच्या नावे पक्के घर नसावे, महाराष्ट्र राज्याचा 15 वर्षापासून रहिवासी असावा, घराचे बांधकाम करण्यासाठी स्वतःची किंवा शासनाने दिलेली जमीन असावी, यापुर्वी कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, वय पूर्ण 18 वर्षे असावे, स्वताःताचे बैंक खाते असावे.

या योजनेंतर्गत घरकुल बांधकामाचे चटई क्षेत्र 269 चौरस फूट असून घरकुल बांधकामासाठी अनुदान रकम ही 2 लक्ष 50 हजार राहील. सदर अनुदान रकम ही चार टप्प्यात लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बैंक खात्यात जमा करण्यात येईल. यात घरकुल मंजूरी मिळाल्यानंतर 40 हजार रुपये, प्लिंथ लेवल 80 हजार, लिंटल लेवल 80 हजार आणि घरकुल पूर्ण झाल्यानंतर 50 हजार असे एकूण 2 लक्ष 50 हजार रुपये अनुदान आहे.



# महिलांनी महाराणी दुर्गावती यांचा आदर्श घ्यावा : भगवानराव कोकाटे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** महाराणी दुर्गावती यांचा आदर्श महिलांनी घ्यावा असे प्रतिपादन बुलढाणा जिल्हा बिरसा क्रांती दलाचे अध्यक्ष भगवानराव कोकाटे यांनी बुलढाणा येथील गर्दे हॉल मध्ये महाराणी दुर्गावती महानाट्यच्या उद्घाटनाप्रसंगी केले. स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त आदिवासी वीरांची समर गाथा या अभियाना अंतर्गत लेखक दशरथ मडावी यांचा गोंडवाना सम्राज्ञी महाराणी दुर्गावती यांच्या जीवन संघर्षाचे महानाट्याचे आयोजन निशुल्क करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष बुलढाणा मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड हे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये या महानाट्याचे निर्माते तथा बिरसा क्रांतिदल महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष दशरथ मडावी तहसीलदार रुपेश खंडारे ,पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सोळंके आदिवासी कार्यालय अकोला चे अधीक्षक पंधाडे आदिवासी विकास परिषदच्या अध्यक्षा नंदिनी टापरे, विष्णू कावे ,बिरसा क्रांतीदल चे जिल्हाध्यक्ष भगवानराव कोकाटे हे आदी उपस्थित होते.

# रस्ता सुरक्षा अभियानातंर्गत जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे बऱ्याचदा अपघात होतात. या पार्श्वभूमिवर, नाशिक शहर पोलिसांच्या वतीने शहरात सध्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानातंर्गत जनजागृती करण्यात येत आहे. वाहतूक नियम न पाळणाऱ्या चालकांचे प्रबोधन करण्यात आले.शहर परिसरात १४ फेब्रुवारीपर्यंत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान चालू राहणार आहे. या अंतर्गत वाहतूक नियमांविषयी सातत्याने प्रबोधन करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या उर्दू शाळेतील ४० विद्यार्थ्यांनी द्वारका चौकात वाहतूक नियम मोडणाऱ्या चालकांचे गुलाबपुष्प, चॉकलेट देवून स्वागत केले. तसेच वाहतुकीच्या विविध नियमांविषयी पत्रकाद्वारे माहिती दिली. सहायक पोलीस आयुक्त (वाहतूक) डॉ. सचिन बारी, यतीन पाटील तसेच शिक्षक उपस्थित होते. वाहन चालवतांना नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत शिवाजी विद्यालयात विविध क्रीडा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालंका देवी शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या आदेश नुसार व माननीय शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आज मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत दिनांक 1 जानेवारी 2024 ते 15 फेब्रुवारी 2024 पर्यंत विविध शालेय क्रीडा स्पर्धा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आलेले आहेत.

यामध्ये शालेय खोखो , कबड्डी, रनिंग क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेले आहेत वर्ग पाचवी ते बारावीतील सर्व विद्यार्थ्यांनी या क्रीडा स्पर्धेमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविलेला आहे विद्यालयाचे प्राचार्य नारायण कोलते यांनी स्पर्धेचे उद्घाटन करून क्रीडा स्पर्धांना सुरुवात झालेली आहे विशिष्ट वयोगट व वजन गट याप्रमाणे विभागणी करून क्रीडा स्पर्धा संपन्न कराव्यात शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणांना वाव देण्यासाठी शालेय स्तरावर अशा स्पर्धा आयोजित करणे ही काळाची गरज आहे कारण आजचा बालक हा उद्याचा पालक असतो व या स्पर्धेच्या माध्यमातून एक उत्कृष्ट खेळाडू निर्माण होऊन आपल्या देशाची व आपल्या गावाची ओळख जागतिक पातळीवर पोहोचू शकतो म्हणून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आव्हान प्राचार्य नारायण कोलते यांनी विद्यार्थ्यांना केले यामुळे या क्रीडा स्पर्धेला अतिशय आनंदाच्या वातावरणात सुरुवात झाली संस्थेचे अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते व संचालक मंडळ यांनी सदरील क्रीडा स्पर्धेसाठी व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेने सहभाग नोंदवा व पारितोषिक मिळवावे असे आवाहन केलेले आहे सदरील स्पर्धेमध्ये वर्ग पाचवी ते बारावीतील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या वयोगटा नुसार वजनानुसार विशिष्ट संघामध्ये विभागणी करून स्पर्धा घेण्यात आल्या मुलींसाठी स्वतंत्र स्पर्धा व मुलांसाठी स्वतंत्र स्पर्धा ठेवण्यात आलेल्या होत्या कबड्डी, खोखो, लांब उडी, उंच उडी, रांगोळी स्पर्धा, रनिंग स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या क्रीडाशिक्षक विजय सिंग राजपूत भास्कर खमाट सुदामसिंग राठोड व जयराम घोती यांनी विशेष मेहनत घेतली त्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक सर्व विद्यार्थी व शिक्षक पालक यांना केले.

याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक विकास पाटील विजय सिंग राजपूत भास्कर ससाणे संजय जोशी भास्कर खमाट मुकुंद व्यवहारे सुदाम राठोड ज्ञानेश्वर राठोड पोपटराव सोनवणे भूषण देसले जीवन कोलते शाम जाधव अजबराव चव्हाण बाबासाहेब कोलते राहुल बडक गणेश मोहने गणेश सत्रे, जयराम घोती,सतीश खवले पंजाबराव शेळके योगेश थोटे सतीश गावंडे जयराम घोती मनोहर पडोळ संजय अमृतकर,शिवाजी सत्रे इत्यादी प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते तर सर्व विद्यार्थी व पालक तो पत्रकार बंधू गोकुळ सिंग राजपूत रहीम पठाण सुनील चोरमले जब्बार तडवी सर्व पालकांचे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार प्रा जीवन कोलते पा.यांनी मानले.

# आरबीआयचे नवे नियम

आधुनिक केसरी

देशातील जवळपास सर्वच बँकांमध्ये ग्राहकांना किमान शिल्लक राखणे बंधनकारक करण्यात आले आहे. न ठेवल्यास बँकेकडून दंड आकारला जातो. गेल्या 5 वर्षांच्या आकडेवारीनुसार, बँकेने दंड आकारून सुमारे 21000 कोटी रुपये कमावले आहेत.आम्हाला कळवा. खात्यातील शिल्लक किमान मर्यादेपेक्षा कमी असल्यास अनेक बँका काही दंड आकारतात. ऑगस्ट महिन्यात वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितले होते की, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खासगी क्षेत्रातील 5 प्रमुख बँकांनी दंड आकारून गेल्या 5 वर्षांत सुमारे 21 हजार कोटी रुपये कमावले आहेत. किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल. वेगवेगळ्या बँकांसाठी हे शुल्क 400 ते 500 रुपयांच्या दरम्यान असते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की अशा खात्यांमधून सर्व पैसे काढले गेले आणि बँक दंड आकारते, तर तुमची शिल्लक ऋणात्मक होईल. त्यामुळे एखाद्याच्या खात्यातील शिल्लक ऋणात्मक जाऊ शकते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशांनुसार, किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल दंडामुळे कोणत्याही खात्यातील शिल्लक ऋणात्मक होणार नाही याची सर्व बँकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. तथापि, याचा अर्थ असा नाही की ग्राहकाला किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल दंड भरावा लागणार नाही. आता पुन्हा तोच प्रश्न पडतो की दंड ठोठावला तर किमान शिल्लक ऋणात्मक होईल. महिन्यात वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितले होते की, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खासगी क्षेत्रातील 5 प्रमुख बँकांनी दंड आकारून गेल्या 5 वर्षांत सुमारे 21 हजार कोटी रुपये कमावले आहेत.किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल. वेगवेगळ्या बँकांसाठी हे शुल्क 400 ते 500 रुपयांच्या दरम्यान असते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की अशा खात्यांमधून सर्व पैसे काढले गेले आणि बँक दंड आकारते, तर तुमची शिल्लक ऋणात्मक होईल. त्यामुळे एखाद्याच्या खात्यातील शिल्लक ऋणात्मक जाऊ शकते.

# आज शिवराज्याभिषेकाचे महत्त्व

आधुनिक केसरी

**भारताच्या इतिहासातील तेजाळणारे आणि लखलखते पान म्हणजे शिवराज्याभिषेक. यावर्षी या शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा त्या निमित्ताने या शिवराज्याभिषेकातील मला उमगलेले महत्व मांडावे म्हणून हा लेख प्रपंच. भारताचे माजी उपपंतप्रधान स्वर्गीय यशवंतराव चव्हाण असे म्हणतात. "छत्रपती शिवाजी महाराज झाले नसते तर पाकिस्तानच्या सीमा तुमच्या आमच्या उंबरठ्यापर्यंत आल्या असत्या". शिवकालीन महान हिंदी कवी भूषण असे लिहितात "शिवाजी न होते तो सुन्नत होती सबकी" हा राज्याभिषेक भारतभूमीत राहणाऱ्या, स्वतःला खऱ्या अर्थाने हिंदवी म्हणवणाऱ्या सर्वांच्या स्वातंत्र्यासाठी प्रेरणास्त्रोतच आहे.**

विरायांनी ज्यासाठी अठरापगड जाती जमातीच्या समाज बांधवांना स्वराज्याची आणि स्वाभिमानाची हाक दिली. परकीयांच्या गुलामगिरीच्या जोखडातून मुक्ततेचे आवाहन केले. ते स्वराज्य आता निर्माण झाले होते. रयतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करतील असे राजे निर्माण झाले होते. आता त्यांना एका प्रस्थापित राज्य व्यवस्थेची गरज होती. रयतेला सर्वमान्य राजे हवे होते म्हणून शिवरायांनी राज्याभिषेक करून घेतला. राज्यव्यवस्थेसाठी एका नि्श्चित अधिष्ठानाची आवश्यकता होती. त्यातून सर्वमान्य असे रयतेचे राज्य निर्माण होणार होते. जुलूम, अन्याय, अत्याचार व गुलामगिरीची राजवट संपवणारे, लोक कल्याणकारी रयतेचे राज्य निर्माण करणारे, स्त्रियांच्या अब्रूचे रक्षण करणारे राजे या राज्याभिषेकाने जनतेला मिळाले. महाराजांनी दिलेलं सर्वात मोठ देणं म्हणजे आत्मसन्मान, स्वाभिमान ती एक भावना जी शिवपूर्व कालखंडात मराठी माणसांमध्ये सुमारे शंभर वर्षांपासून संपली होती. ५ जून १६७४ ला संध्याकाळी राज्याभिषेकाच्या सोहळ्याला सुरुवात झाली. तो सोहळा मध्यरात्री पर्यंत सुरू होता. शिवराज्याभिषेकाचे आणखी एक कारण म्हणजे मुघल, सुलतान, इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, सिद्धी, व इतर स्थानिक सत्ताधीश महाराजांना राजा मानत नव्हते. एका जहागीरदाराचे बंडखोर पुत्र यापेक्षा वेगळे स्थान ते देत नव्हते. रयतेत महाराजांबद्दल प्रचंड आत्मीयता, प्रेम, जिव्हाळा, आदर होताच. पण प्रशासकीय कामे करतांना मुघल किंवा सुलतानांचेच शिक्के चालत. त्यामुळे रयतेची द्विधा मनस्थिती होई. महाराज वंशपरंपरागत राजे नव्हते. त्यांनी छत्रपती होण्यासाठी कोणताही विधी केलेला नव्हता. राज्य असूनही राजेपण नव्हते. त्यामुळे राजकीय स्थैर्य येत नव्हते. लोकांच्या मनामध्ये विश्वास निर्माण होण्यासाठी व प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी त्यांचे अभिषिक्त सम्राट होणे त्यावेळच्या परिस्थितीसाठी अत्यंत आवश्यक होते. खरंतर राजे देशभरातील जनतेच्या हृदय सिंहासनावर आधीच विराजमान झाले होते, आता लौकिक अर्थाने ते सिंहासनावर विराजमान होणार होते. हे सोनेरी सिंहासन रामजी दत्तो यांनी अत्यंत कलाकुसरीने बनविले होते. काशीहून खास राज्याभिषेकासाठी आलेले पंडित गागाभट्ट यांच्या सुचनेनुसार महाराज सिंहासनाकडे मार्गक्रमण करीत असताना, प्रत्येक पायरी चढताना आणि प्रत्येक पाऊल टाकताना त्यांच्या मनाच्या भावविश्वामध्ये सुखदुःखाच्या आठवणींचा कल्लोळ माजला होता. या हिंदवी स्वराज्य निर्मितीसाठी त्याच्या स्थापनेपासून म्हणजे आपल्या बाल सवंगड्यांसह घेतलेल्या रायरेश्वराच्या मंदिरातील प्रतिज्ञेपासून आजच्या राज्याभिषेकाच्या आनंद सोहळ्यापर्यंत ज्या ज्या विलक्षण घटना घडल्या त्यांची आठवण व ज्यांनी या स्वराज्यासाठी आपल्या जीवनासह सर्वस्व समर्पण केले त्या सर्वांची आठवण महाराजांना या क्षणी होत होती. मग त्यात आई-वडिलांकडून मिळालेली रयतेच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेची प्रेरणा, बाल सवंगड्यांसह रायरेश्वराच्या मंदिरात परकीयांची गुलामगिरी झुगारून देऊन रयतेच्या हिंदवी स्वराज्य निर्मितीची घेतलेली प्रतिज्ञा, प्रतापगडाच्या पायथ्याशी स्वराज्याचा घास गिळण्यासाठी आलेल्या आदिलशहाचा मातब्बर सरदार अफजलखानाचा कोथळा बाहेर काढल्याचा प्रसंग, सिद्धी जोहरच्या पन्हाळ्याच्या वेढ्यातून आपले महाराज यशस्वीपणे बाहेर पडण्यासाठी स्वतः महाराज बनून स्वतःचे प्राण देणारे शिवा काशिद व महाराज विशाळगडावर सुखरूप पोहोचेपर्यंत गाजापूरची खिंड पावन करणारे बाजीप्रभू देशपांडेंचे बलिदान, शाहिस्तेखानाच्या लाल महालात शिरून त्याची बोटे छाटल्याचा प्रसंग, दिलेरखानाच्या पुरंदर वरील हल्ल्यात स्वतःच्या प्राणांची बाजी लावणारे मुरारबाजी देशपांडे, मिर्झाराजे जयसिंगाशी 23 किल्ले आणि चार लक्ष होनांचा मुलुख देऊन केलेल्या तहाची, बादशहाने आपल्याला आग्रा येथे कैद केल्याची घटना, आग्र्याहून आपल्या सुटकेसाठी जीवावर उदार होणाऱ्या मदारी मेहतर व हिरोजी फर्जंद यांची, मुलाचे लग्न सोडून कोंढाण्यावर गेलेल्या तानाजी मालुसरेंच्या प्राणार्पणाची, तर आपल्या केवळ सहा साथीदारांसह बहलोलखानाच्या प्रचंड सैन्यावर तुटून पडणाऱ्या सेनापती प्रतापराव गुजरांची. याशिवाय राज्याभिषेकाच्या वेळी महाराजांकडे ३६० किल्ले होते ते किल्ले घेताना आलेले अनुभव. हे स्वराज्य उभे करण्यासाठी अनेक मावळ्यांनी स्वतःच्या जीवाची बाजी लावली. हा राज्याभिषेक त्या समस्त वीरांच्या समर्पणाचा, त्यागाचा राज्याभिषेक होता. पुरंदरच्या तहात महाराजांकडे फक्त 12 किल्ले एक लक्ष होनांचा मुलुख शिल्लक होता .त्यानंतर नऊ वर्षांनी महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यावेळी महाराजांकडे ३६० किल्ले होते. म्हणजे महाराजांनी आग्र्याच्या सुटकेनंतर केवळ ८ ते ९ वर्षात ३४८ किल्ले मिळवले. ही घटना सुद्धा विलक्षण अचंबित करणारी आहे. त्यातही महाराज व शंभूराजे आग्र्याहून राजगडावर सुखरूप आल्यानंतर महाराजांनी काही कालखंड पुढील मोहिमांच्या तयारीसाठी घेतल्याचे दिसून येते. महाराजांच्या एकूण जीवन प्रवासाचा अभ्यास केला तर आपल्या सहजच लक्षात येते संकटेच आपल्याला शक्ती देतात, साहस देतात, ताकद देतात, ऊर्जा देतात, जिद्द देतात, तुमची उंची वाढवतात, तुमचे सामर्थ्य वाढवतात.

स्वतः आलमगीर बादशहाला या रयतेच्या राज्याची भीती वाटत होती कारण हे राज्य कोणा बादशहा किंवा सुलतानाचे नव्हते तर ते रयतेचे राज्य होते. प्रत्येकाला हिंदवी स्वराज्य आपलेच वाटत होते,जणू प्रत्येकजण शिवरायंच झाला होता. हा राज्याभिषेक शिवरायांनी स्वतःच्या सुखासाठी किंवा वैभवासाठी केला नव्हता, तर स्वराज्य अधिक भक्कम व्हावे म्हणून केला होता. समाजमान्य, राजमान्य, जगन्मान्य होण्यासाठी राजे अभिषिक्त झाले होते. महाराज सिंहासनावर आरुढ झाल्यानंतर रायगडाचा सारा आसमंत घोषणांनी निनादून गेला. "क्षत्रिय कुलावतंस सिंहासनाधीश्वर श्रीमंत श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय" वाद्यांचा कडकडाट ढोल, ताशे, सनई, चौघडे, नौबती, तुताऱ्या झडू लागल्या. चारही दिशांना तोफा दुमदुमू लागल्या. राष्ट्रभूमीला राजे छत्रपती लाभल्याची आनंदवार्ता देशभरात पसरली. जणू वारा सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये जाऊन सांगत होता, "राजे छत्रपती झाले". रयतेचे राज्य स्थापन झाले. कित्येक शतकानंतरची ती पहिली अलौकिक स्वातंत्र्याची रम्य पहाट होती. त्या अद्वितीय सकाळी रायगडाचा परिसर सूर्याच्या सोनेरी प्रकाशात भगव्या रंगाने न्हाऊन निघाला होता. राजमाता जिजाऊंचे डोळे या अलौकिक आनंद सोहळ्याने पाणवले होते. याचसाठी केला होता अट्टाहास. ते त्यांचे स्वप्न आज पूर्ण झाले होते. या अलौकिक क्षणाची बातमी सर्व जगभर पसरली. राज्याभिषेकामुळे शेजारच्या राज्यांशी करार करणे सोयीचे झाले. राज्याभिषेका पासून छत्रपती शिवाजी महाराजांनी नवीन शक ही कालगणना सुरू केली. म्हणजे राजे शककर्ते झाले. महाराजांनी राज्याभिषेकापासून दोन नाणी एक 'शिवराई' आणि दुसरे 'होन' काढली. फारसी भाषेतला राज्यकारभार स्वभाषेत व्हावा म्हणून महाराजांनी 'रघुनाथपंत हणमंते' यांच्याकडून राज्यव्यवहार कोषाची निर्मिती केली. तत्पूर्वी सर्वत्र यवनांची सत्ता असल्याकारणाने राजभाषा ही फारसी होती. हा राज्यव्यवहार कोश तयार करताना महाराजांनी विजयनगर साम्राज्यातील राज्यव्यवहार कोश चा आधार घेतला होता. विजयनगरच्या सत्ताधीशांनी राज्यव्यवहार कोश तयार करताना वेद, उपनिषदांचा आधार घेतला होता. हे जागतिक दर्जाचे इतिहासकार त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. राज्याभिषेकापासून त्यानुसार अंमलबजावणी सुरू केली.

म्हणूनच हा राज्याभिषेक केवळ महाराजांचा नव्हता तर तो येथील रयतेचाही होता. जसा एखादा सिंह मेंढरांच्या कळपात राहिल्याने आपले सिंहत्व विसरून जातो. अगदी तसेच हिंदूंचे झाले होते. महाराजांचे वेगळेपण हेच आहे की त्यांनी त्या सिंहाला पुन्हा जाणीव करून दिली. की तूच राजा आहेस. एकदा हे सिंहाला समजल्यावर तो जशी डरकाळी फोडत गुरगुरतो अगदी तसेच रयतेचे झाले. त्यांच्या नुसत्या गुरगुरण्याने ही शत्रूला घाम फुटू लागला. राज्याभिषेकाने त्याच्या या अंतःशक्तीवरच शिक्कामोर्तब झाले. महाराजांनी या रयतेच्या मनात स्वतःबद्दल एक आगळावेगळा विश्वास निर्माण केला होता. स्वराज्या प्रति निर्माण झालेला हा विश्वास म्हणजे आपण लढू शकतो, आपण जिंकू शकतो, आपण आपले राज्य निर्माण करू शकतो. म्हणजेच आधी मरेपर्यंत लढणाऱ्या मराठ्यांना जिंकेपर्यंत लढण्याची प्रेरणा दिली. खरंतर राज्याभिषेक म्हणजे शतकानूशतकांच्या अंधार कोठडीतून बाहेर निघालेला तो एक तळपता, दैदीप्यमान प्रकाशाचा सूर्य होता. सातव्या आठव्या शतकापासून जी इस्लामी आक्रमणे सुरू झाली. त्यांनी अखंड भारतावर कब्जा केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आगमनापूर्वी सुमारे शंभर वर्ष संपूर्ण भारताचे क्षात्रतेज लयास गेले होते. भारतीय संस्कृती व परंपरांना उतरती कळा लागली होती. यावेळेस या सर्वांवर मात करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे आगमन झाले ते आगमन विलक्षण ओजस्वी व तेजस्वी ठरले. निराशेच्या घनदाट अंधारात स्वच्छ प्रकाशाची वाट चोखाळणारी माणसे फार थोडी असतात. अशी माणसे निर्माण करण्यात महाराज यशस्वी झाले होते. येथील प्रत्येक व्यक्ती स्वतः राजा असल्याप्रमाणे आपल्या राज्याचा रक्षक होता. तो तिथे चाकर नव्हताच. त्याला कोणाच्या आदेशाची गरजच नव्हती. ही भावना आपल्या रयतेच्या मनात स्वराज्याविषयी निर्माण करण्यात महाराज यशस्वी झाले. ही एक मोठी लोकक्रांतीच होती. खरेतर त्याचीच औरंगजेबाला भीती वाटत होती. म्हणूनच स्वतःचं एवढं मोठं देशभर आणि देशाबाहेरही पसरलेले साम्राज्य असताना त्याच्या शंभर पट लहान असलेल्या स्वराज्याचा घास घेण्यासाठी तो सतत धडपडत होता. महाराजांच्या मृत्यूनंतर तर तो स्वतः २७ वर्ष आपलं लाखोंचं सैन्य व अब्जावधी संपत्ती घेऊन महाराष्ट्रात ठाण मांडून बसला. पण त्यात त्याला यश आलेच नाही. याउलट त्याचा शेवटही याच भूमीत झाला.

प्रा. प्रशांत शिरुडे
डोंबिवली. , मो. 9967817876

# दहशतवादामुळेच इराणने पाकिस्तानवर केला हल्ला



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२१५

आधुनिक केसरी

**इराण आणि इस्राईल यांच्यातील शत्रुत्व जगजाहीर आहे. इस्राईल आणि हमास युद्धात इराणने हमासची बाजू घेतली इतकेच नाही तर हमासला थेट लष्करी सामुग्री व आर्थिक मदत केली त्यामुळे इस्राईल आणि इराण यांच्यातील तणाव वाढला आहे. इस्राईल हमास युद्धानंतर २०२४ ला इस्राईल इराण युद्ध होईल असा कयास जाणकार लावत होते जाणकारांचा हा कयास खरा ठरेल की नाही हे येत्या काळात कळेनच पण त्याआधी नववर्षाच्या तोंडावर इराणने इस्राईलवर हल्ला न करता इराक, सीरिया आणि पाकिस्तानवर हल्ला केला. इराणने इराक आणि सीरिया यांच्यावर हल्ला केला यात विशेष काही नाही कारण या दोन्ही देशात इस्राईलचा दूतावास आहे.**

इराणने या दोन्ही देशातील इस्राईलच्या दुतावासांवर हल्ला केला मात्र इराक आणि सीरियावर हल्ला करताना इराणने पाकिस्तानवरही हल्ला केला. इराणने पाकिस्तानच्या काही भागात क्षेपणास्त्र डागल्याने जगभर आश्चर्य व्यक्त केले जात आहे कारण पाकिस्ताननेही इस्राईल हमास युद्धात हमासला पाठिंबा दिला होता तरी इराणने पाकिस्तानवर हल्ला का केला असा प्रश्न विचारला जात आहे अर्थात याचे उत्तर आहे पाकिस्तानने पोसलेला दहशतवाद. इराणने पाकिस्तानवर हल्ला केला त्याला इस्राईल हमास युद्ध हे कारण नाही तर पाकिस्तानमधील जैश - अल - अदल ही दहशतवादी संघटना हे कारण आहे. जैश अल अदल ही दहशतवादी संघटना पाकिस्तान - इराण सीमेवर कार्यरत असून गेल्या काही दिवसांपासून ही दहशतवादी संघटना इराणच्या मुलखी आणि लष्करी अधिकाऱ्यांना लक्ष करत आहे. पाकिस्तान आणि इराण यांच्यातील सुमारे ९०० किलोमीटरची सीमा पूर्णपणे बंधिस्त नाही याचाच फायदा घेऊन ही दहशतवादी संघटना थेट इराणमध्ये शिरून दहशतवादी कारवाया करत आहे. या दहशतवादी संघटनेवर कारवाई करावी अशी विनंती इराणने पाकिस्तानकडे अनेकदा केली मात्र पाकिस्तानने इराणच्या या मागणीकडे दुर्लक्ष केले इतकेच नाही तर या दहशतवादी संघटनेला आर्थिक आणि लष्करी मदत पुरवली त्यामुळे चिडून इराणने अखेर पाकिस्तानात घुसून या दहशतवादी संघटनेवर सर्जिकल स्ट्राईक केला. इराणने पाकिस्तनवर हल्ला केल्यामुळे पाकिस्तानचा तिळपापड होणे साहजिकच आहे आणि झालेही तसेच पाकिस्तानच्या काळजीवाहू पंतप्रधानांनी इराणचा निषेध करत इराणला याचे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला अर्थात हा इशारा देताना त्यांनी नेहमीप्रमाणे इराणने केलेला हा सर्जिकल स्ट्राईक भारताच्या इशाऱ्यावर केला असल्याचा आरोप केला. इराणने जेंव्हा हा हल्ला केला तेंव्हा योगायोगाने भारताचे परराष्ट्रमंत्री जय शंकर हे इराणच्या दौऱ्यावर होते हाच धागा पकडून पाकिस्तानने हा आरोप केला अर्थात भारतावर आरोप करण्यापेक्षा इराणने हा हल्ला केला याचा विचार पाकिस्तानने करावा. पाकिस्तानने दहशतवाद पोसला आहे. याच दहशतवादामुळे पाकिस्तानचे शत्रू वाढत आहेत हे पाकिस्तानने लक्षात घ्यावे. भारत हा पाकिस्तानचा पारंपरिक शत्रू आहे मात्र अफगाणिस्तान आणि इराण हे एकेकाळी मित्र असलेले देश देखील आता पाकिस्तानला शत्रू मानू लागले आहेत याला कारणीभूत आहे तो पाकिस्तानने पोसलेला दहशतवाद. पाकिस्तानने अजूनही दहशतवादाला थारा देणे बंद केले नाही तर भविष्यात आणखी काही देश पाकिस्तानचे शत्रू बनतील. दहशतवाद पोसताना आपण आणखी किती शत्रू निर्माण करणार आहोत याचा विचार पाकिस्तानने करायला हवा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# 'त्या' नराधमास फाशीची शिक्षा देण्याची मागणी

## धर्माबादेत सकल मराठा समाजाचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** मुदखेड तालुक्यांतील रोहीपिंपळगाव येथे चिमुकली वर अत्याचार करणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी सकल मराठा समाज धर्माबाद च्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली. उपरोक्त मागणीचे निवेदन तहसिलदार धर्माबाद यांना देण्यात आले.

एका सहा वर्षीय चिमुकली वर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली हा प्रकार माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे.या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. सदरील प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे व आरोपी नराधमांस फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनाची प्रत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्हाधिकारी नांदेड, जिल्हा पोलिस अधीक्षक नांदेड यांना तहसिलदार धर्माबाद यांच्या मार्फत देण्यात आले यावेळी उपस्थित व्यंकटराव पा.जाधव, सतिश पा.शिंदे,संजय पा.पवार, दिपक पा.चोळाखेकर, शिवराज पा.चोळाखेकर, हनमंत पा.नरवाडे, प्रशांत रापतवार, नारायण पा. पवार,दत्ताहरी पा.कदम,शिवाजी पा.बाभळीकर, नामधारक पा.कदम,राजु भद्रे,आवरे पाटील व ईतर उपस्थित होते..

# स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त दिंडी व पालखी सोहळा

## माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली टेळकी ते माहुरगड दिंडी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते,लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त श्री संत गोविंद बुवा मठ संस्थान टेळकी ता.लोहा येथून टेळकी ते श्रीक्षेत्र माहूरगड पायी दिंडी व पालखी सोहळा यात्रेचे प्रस्थान झाले. माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त सलग १९ व्या वर्षी टेळकी ते श्रीक्षेत्र माहूरगड पायी दिंडी यात्रा प्रस्थान काल दि.(१८) जानेवारी २४ रोजी गुरूवारी सकाळी १०.०० वाजता माजी आमदार रोहिदास चव्हाण, रामराव पाटील जोशीसांगवीकर, भिमराव पाटील शिंदे यांच्या सह मान्यवरांनी ग्रामदैवत मोरोती मंदिर,दत्त मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व विविध ग्रामदेवतांना पुष्प हार घालून,आरती करून नारळ फोडून पालखीचे प्रस्थान झाले.मजल दर मजल करत मुखी नाम घेत दि. (२३) जानेवारी रोजी मंगळवारी श्रीक्षेत्र माहुरगड येथे मुक्कामी जाईल व दि. (२५) जानेवारी २०२४ रोजी गुरूवारी सकाळी महापुजा आयोजित करण्यात आली आहे.तत्पुर्वी दररोज मुक्कामाच्या ठिकाणी महापुजा व पहाटे ४ ते ६ धावे विनंत्या,अर्जी,भुपाळी,आरती दैनिक कार्यक्रम असल्याचे दिंडी चालक व आयोजक बालाजी गिरी श्रीसंत गोविंद बुवा मठ संस्थान यांनी सांगितले. पालखीचे प्रस्थानच्यावेळी फटाक्यांची आतषबाजी करून जागोजागी पुजन टाळ मृदंगाच्या गजरात मुखे दत्त नामाचा गजर निनादत होता. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातुर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण,हरबळ मठसंस्थानचे शामगीर महाराज, जेष्ठ शिवसैनिक रामराव पाटील जोशीसांगवी,भिमराव पाटील शिंदे माजी सरपंच तथा खरेदी विक्री संघ संचालक, बालाजी महाराज गिरी , माधवराव मोरे उपसरपंच, शंकरराव मोरे व्हा.चेअरमन, शंकरराव बालाजीराव मोरे,माधवराव मोरे, सुनिल मोरे, संदीप देशमुख सरपंच, चंद्रकांत मोरे,भारत हंबर्डे तंटामुक्ती अध्यक्ष,कैलास मोरे,साहेबराव हंबर्डे,आदीसह शेकडो भाविक भक्त , ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





# श्रद्धा साळुंके मॅरेथॉन स्पर्धेत विजयाची मानकरी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील सेंट मोनिका इंग्लिश माध्यमिक विद्यालयाची इयत्ता१० वी ची विद्यार्थीनी श्रद्धा सचिन साळुंके यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त आयोजित डॉ. बाबासाहब आबेडकर पुतळा ते सेंट मोनिका इंग्लिश स्कुल ह्या दोन किमी अंतराच्यामॅरेथॉनमध्ये स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक मिळवून ब्राँझ पदकाची मानकरी ठरली, त्यांना सदरील पदक माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी,प्रिन्सिपॉल किशोर साळुंके,व स्वाती खैरनार तसेच पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कोठाळे यांच्या हस्ते नुकतेच प्रदान करण्यात आले ,तिच्या या यशाबद्धल माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, से,नि, पोलीस निरीक्षक सोपानराव निकम,पत्रकार संघ च्या वतीने दीपक बरकसे यांनी श्रध्दा चे अभिनंदन केले.



# चांदई ठोंबरी येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** येथून जवळ असलेल्या चांदई एक्को केंद्रातील चांदई ठोंबरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानात शालेय क्रीडा स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या.या स्पर्धेत केंद्रातील एकूण 15 शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.उत्साही वातावरणात क्रीडा स्पर्धा पार पडल्या. विजयी स्पर्धकांचे गटशिक्षणाधिकारी दिलीप शहागडकर, गट समन्वयक एस.बी.नेव्हार, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती भिंगोले, केंद्रप्रुख आण्णा इंगळे, केंद्रीय मुख्याध्यापक प्रल्हाद पालोदे यांनी अभिनंदन केले.

सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी सरपंच साहेबराव ठोंबरे, नवनाथ फुके , शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती भिंगोले, केंद्रप्रमुख आण्णा इंगळे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष योगेश ठोंबरे,गणेशराव देठे, संदीप घोरपडे,प्रभू आदबने यांची उपस्थिती होती.मुख्याध्यापक माधव गंधपवाड यांनी शाल,श्रीफळ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. केंद्रप्रमुख आण्णा इंगळे यांनी प्रस्तावणेतून खेळाचे महत्त्व पटवून दिले. सदर क्रीडा स्पर्धा 1ते 5 व 6ते 8 या दोन गटात घेण्यात आल्या. खो-खो,कब्बडी,धावणे,उंच उडी, लांब उडी या क्रिडा प्रकारात ह्या स्पर्धा घेण्यात आल्या.चांदई ठोंबरी शाळेतील मुलीच्या संघाने खोखोमध्ये तर मुलांच्या संघाने कबडीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. वर्ग 6 ते 8 या गटात या चांदई एक्को या शाळेने वरील क्रिडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच धावण्यामध्ये सुदर्शन ठोंबरे ,दुर्गा नागवे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

लांब उडीमध्ये कार्तिक गाडेकर, वैष्णवी आदबने यांनी प्रथम क्रमांक पटकावला.लांब उडी वर्ग 6 ते 8 या गटातून विनायक दत्तु गवळी ,अश्विनी कदम यांनी प्रथम क्रमांक पटकावला.धावण्यामध्ये 6 ते 8 या गटातून विनायक गवळी, साक्षी गाडेकर, अश्विनी पवार या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. केंद्राचे केंद्रप्रुख आण्णा इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा घेण्यात आल्या.पंच म्हणून अनिल वरकड,विकास मोरे,दिपक गाडेकर, विजय साळवे यांनी काम पाहिले तर गुणलेखक म्हणून ज्ञानेश्वर गायके, सतीश इंगळे यांनी जबाबदारी पार पाडली. टाईम किपर म्हणून बबनराव घुगे, राम राऊत यांनी काम पाहिले.स्पर्धेसाठी यशस्वी होण्यासाठी कांता पुंगळे ,रामेश्वर चेके, आर.एच.दानवे, प्रशांत पिसे,उदय जगताप, देवीचंद सानप,कल्पना पवार, अश्विनी सोणवने,वर्षा औताडे,अर्चना राजे यांचे मोलाचे सहकार्य लाभले .



# व्हॉईस ऑफ मीडियाच्या राज्य कार्यालयाचे उद्घाटन

## मान्यवरांनी व्यक्त केले समाधान : राज्यातला ग्रामीण भाग होणार कनेक्ट

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**बार्शी :** व्हॉईस ऑफ मीडियाच्या राज्य कार्यालयाचे उद्घाटन बार्शी येथे मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पार पडले. व्हॉईस ऑफ मीडियाच्या बार्शी येथील मुख्य कार्यालय आता ग्रामीण भागाचा कनेक्ट वाढवणार आहे. ग्रामीण भागातील संघटना वाढीसाठी आणि ग्रामीण भागातल्या पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी हे कार्यालय महत्त्वपूर्ण असल्याची माहिती ही या निमित्ताने देण्यात आली.

यावेळी ह.भ.प.ॲड.जयवंत बोधले महाराज, आमदार राजेंद्र राउत, माजी मंत्री ॲड.दिलीप सोपल, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संदिप काळे, कार्याध्यक्ष योगेंद्र दोरकर, उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, वृक्ष वितरण संस्थेचे बाळासाहेब पानसरे, आरोग्य विभागाचे प्रमुख भिमेश मुतुला, सरचिटणीस चेतन कात्रे, विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया, अरुण ठोंबरे, अमर चोंदे उपस्थित होते.



बोधले म्हणाले, पत्रकारांच्या कल्याणासाठी पंचसुत्रीच्या माध्यमातून व्हॉईस ऑफ मीडिया संस्थेचे कार्य सध्या सुरु आहे. पत्रकार बऱ्याचदा अपूर्व काय आहे हे शोधत असतात. कोणत्याही कार्यक्रमातील अचूक शोधण्याची बुध्दी भगवंताने पत्रकारांना दिली आहे. एखाद्याच्या भाषणातील नेमका मुद्दा काय, हे त्यांना राजहंसाप्रमाणे कळतो, तो सारासार विचार करणारा, स्थिर बुध्दीचा व स्थितप्रज्ञ असतो. कारण तो समस्त परिस्थितीकडे साक्षीभावाने पाहत असतो, तो कोणाही एका विशिष्ट पक्षाचा नसतो, त्याच्यातून बाहेर राहून एका तटस्थ व्रत्तीने बघत असतो की नेमके हे काय आहे. तशा व्रत्तीने काम करणारा समाजातील एक अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे पत्रकार होय. समाजातील स हे अक्षर संस्कार, सात्विकता, संस्कृती समन्वयाचे असल्याने ही पत्रकारिता टिकणे अत्यंत गरजेचे आहे. ती गरज व आवश्यकता ओळखून व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेने बार्शीसारख्या अत्यंत अध्यात्मिक आणि ऐतिहासिक द्रष्टीकोनातून महत्वपूर्ण स्थान असलेल्या नगरीमध्ये आज राज्याचं कार्यालय होतंय, खरंतर हा आम्हा सर्व बार्शीकरांच्या दृष्टीने अत्यंत मोठा अभिमान आहे. बार्शीला व्हॉईस ऑफ मीडियाची राज्याची पत्रकारांची राजधानी म्हणायला आता हरकत नाही. पत्रकारांच्या हातातील लेखनी आणि साधुसंतांची वाणी एकत्र झाली तर समाजामध्ये नक्की बदल होईल. सोपल म्हणाले, पत्रकारांच्या संघटनेचे व्हाईस ऑफ मीडिया हे नाव सर्वसामान्यांचा आवाज दर्शविणारे, सुरु असलेल्या कार्याला खूप साजेसे असून, यातील विश्वस्त हे लोकांना आश्वस्त करणारे आहेत. अनेक पत्रकार हे नुसत्या पत्रकारितेवर अवलंबून आहेत, अनेक पत्र ही त्याचा व्यवसाय म्हणून अवलंबून आहेत याचा मेळ घालायचे काम या संघटनेचे आहे. काही चॅनल्स पूर्वी कसे बोलत होते आता कसे बोलतात हे आपल्या लक्षात येते. पण सध्या जो सोशल मीडिया कार्यरत आहे त्याची समाजाला गरज आहे. मोठी माणसं आता आपल्या उपयोगाची नाहीत, छोटी माणसंच आपल्याला न्याय देतील अशी लोकभावना आता निर्माण झाली आहे. संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदिप काळे म्हणाले, बार्शीला संघटनेचे कार्यालय सुरु करण्यामागे अनेक वेगवेगळे विषय होते. बहुतांशी जिल्ह्यांना जोडणारा दुवा असलेले ठिकाण म्हणून त्याचा विचार केला. ग्रामीण महाराष्ट्राला जोडण्यासाठी, संपर्कासाठी याची गरज होती. मोठ्या शहरापेक्षा तालुक्याच्या ठिकाणी स्कोप असतो. न्यायाधिशाला देखिल कुठेतरी व्यक्त व्हावेसे वाटते तेव्हा त्याला पत्रकार दिसतो. परंतु पत्रकारिता करणारी संपूर्ण यंत्रणा आज हतबल होवून बसलेली आहे. उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ यांनी प्रास्ताविकात पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी केलेल्या उपाययोजना आणि भविष्यातील आराखडा मांडला. मुद्रण, इलेक्ट्रॉनिक्स, डिजीटल अशा वेगवेगळ्या विभागात कार्य करणाऱ्या पत्रकारांचे संरक्षण, आरोग्य, शिक्षण, निवारा अशा मूलभूत गजरांची पूर्तता करण्यासाठी विविध विंगच्या माध्यमातून कार्य सुरु असल्याचे सांगीतले. ऐंशी टक्यांपेक्षा जास्त पत्रकारांचे मासिक उत्पन्न हे पंधरा हजारांपेक्षा कमी असून त्यातून त्यांचा उदरनिर्वाह कसा होणार हा मोठा प्रश्न आहे. म्हणून पत्रकारांसाठी एखादा जोडधंदा निर्माण करण्याकरिता स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

आमदार राजेंद्र राउत म्हणाले, पत्रकारांच्या समस्या व त्यांचे संरक्षण होण्यासाठी अशा संघटनेची गरज होती. राजकिय व्यक्ती असो वा पत्रकार त्यांना उपजिवीकेसाठी इतर जोडव्यवसाय आवश्यक असतात. पत्रकारांसाठी आपली भूमिका ही नेहमीच सहानुभुतीची राहिल. एखाद्या बातमीमुळे एखाद्याचे आयुष्य बरबाद होवू नये तसेच सामान्यांना मार्गदर्शनासाठी विविध उपक्रमांची गरज असते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस कार्यालयाच्या इमारतीची फित कापून, नामफलकाचे उदघाटन व दीपप्रज्वलन करण्यात आले. उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ यांनी प्रास्ताविक केले, अपर्णा दळवी यांनी सूत्रसंचलन केले, गणेश भोळे यांनी आभार मानले.

# फुलंब्री शहरातील अतिक्रमण काढणार : तहसीलदार कानगुले

## व्यापाऱ्यांना नोटीस जारी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील मुख्य रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले असून सदरील अतिक्रमण धारकांना तालुका प्रशासनाच्या वतीने नोटीसा जारी केल्या आहेत. सात दिवसांच्या आत आपापले अतिक्रमण काढून घेण्याचेही या नोटीसीत नमूद केले आहे. तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले, नगरपंच्यायतीचे मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव, पोलिस निरीक्षक रवींद्र निकाळजे, बांधकाम विभागाचे अभियंता शुक्ला यांच्यासह तालुका प्रशासनातील विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी संक्रांतीच्या मुहूर्तावर या कारवाईला सुरूवात केली.

प्रथमदर्शनी अतिक्रमण धारकांना समजावून सांगत आपाआपले अतिक्रमण काढण्याचे सांगून त्यांना नोटीस देण्यात आल्या. येत्या सात दिवसांत मुख्य रस्त्यावरील सर्व अतिक्रमण काढून मुख्य रस्ता मोकळा करणार असल्याचे मुख्याधिकारी भालेराव यांनी यावेळी सांगितले. एकूणच फुलंब्री शहरातील मुख्य रस्त्यावर अनेक व्यावसायिकांनी अतिक्रमण केले असून त्यात व्यावसायिकांची वाहने, ग्राहकांची वाहने त्याच प्रमाणे फळविक्रेते यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असून या सर्वांना मुख्य रस्त्यावरच आपापली दुकाने थाटली आहेत. तालुका प्रशासनाच्या वतीने संक्रांतीच्या मुहूर्तावर सर्वांना समज देऊन अतिक्रमण काढण्यास सांगितले. जर येत्या 7 दिवसांत अतिक्रमण न काढल्यास प्रशासनाच्यावतीने कडक कारवाई करत संबंधित अतिक्रमणाच्या ठिकाणी असणाऱ्या गाड्या तसेच समान जप्त करणार असल्याचे तालुका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

# ज्ञान कुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये हळदी कुंकवाचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज इंटरनॅशनल स्कूल बाजार सावंगी येथे आनंद नगरी व हळदी कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडला. हळदी कुंकवाला महिला पालकांचा मोठा प्रतिसाद होता. विद्यार्थ्यांनी आनंद नगरीत व्यावसायिक ज्ञान प्राप्त केले. कार्यक्रमाची उद्घाटन  महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के सर यांच्या हातून करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानकुंज इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक प्रा.डी. बी.पाटील सर,श्रीमती ज्योती पाचवने, आलिया खान, श्रीमती स्वाती चोपडे, अजिनाथ जाधव, प्रा.मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे, प्रा.नितीन पवार, प्रा.राम राठोड,श्रीमती वृषाली कुलकर्णी, प्रा.कृष्णा चव्हाण, प्रा.अविनाश गाडेकर प्रा.योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव,प्रा.राहुल गायकवाड,श्री भूषण जाधव, अविनाश कोलते, क्लार्क अक्षय जाधव, शिपाई धुमाल बाबा, वाहठुळे मावशी यांची उपस्थिती होती.



# कॉलेज हे विद्यार्थ्यांचे दुसरे कुटुंब असते : दीपाली शेळके

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२४ या शिबिराचे आयोजन लोणंदच्या रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोरेगाव ता.फलटण येथे करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून लोणंद नगरपंचायतच्या नगरसेविका दिपाली शेळके यांना आमंत्रित करण्यात आले होते.यावेळी विद्यार्थ्यांना श्रमसंस्कारा बद्दल विशेष मार्गदर्शन केले. कॉलेज हे विद्यार्थ्यांचे दुसरे कुटुंब असते असे नगरसेविका दिपाली शेळके यांनी म्हटले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव  होते. नगरसेविका दिपाली शेळके म्हणाल्या की,ग्रामीण भागाच्या विकासामध्ये विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान देणे आवश्यक आहे.राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना श्रमाची प्रतिष्ठा शिकवते.श्रमाचे मोल शिकवित असते.कॉलेज हे विद्यार्थ्यांचे दुसरे कुटुंब असते. या श्रमसंस्कार शिबिरामध्ये तुम्ही जे गावांमध्ये आरोग्यविषयक, सामाजिक, आर्थिक, जनजागृती करणार आहात यातून गावाचा विकास होणार आहे. त्याचबरोबर आपण त्यातून अनुभवाची आयुष्यभरासाठी शिदोरी घेऊन जाणार आहोत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो.या प्रामाणिक भावनेने काम करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कामाचा आदर्श  गावापुढे ठेवला पाहिजे.असे सुद्धा त्यांनी म्हटले.




महाविद्यालयाचे प्र .प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव म्हणाले, " राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याच्या हेतूने अनेक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांनी आर्थिक,शैक्षणिक,आरोग्यविषयक सर्वेक्षण करून लोकांच्या मध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.ग्रामस्वच्छता, पाणी आडवा पाणी जिरवा यासारख्या उपक्रमाबद्दल लोकांना त्याचे महत्त्व पटवून द्यावे.विद्यार्थ्यांच्यामध्ये विचार प्रगल्भता वाढावी ही या संस्कार शिबिराचे  उद्देश आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ग्रामीण जीवन पद्धती याचाही समावेश केलेला आहे. यावेळी विचारपीठावर कोरेगाव ग्रामपंचायतच्या सरपंच उज्वला शिंदे,उपसरपंच विश्वास गोवेकर, सदस्य रणजीत गोवेकर,सदस्य दादासो गोवेकर, सदस्य अशोक गोवेकर, भानुदास गोवेकर, विकास सोसायटीचे चेअरमन रामचंद्र शिंदे, उपप्राचार्य भीमराव काकडे, मॅग्नेशिया केमिकल व अरिश्ता केमिकल कंपनीचे महेश गोडसे, कार्यक्रमाधिकारी डॉ. बाबासाहेब सायमोते, कार्यक्रमाधिकारी डॉ.अनिल जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी या शिबिराचे उद्घाटन माजी सरपंच सुनील शिंदे यांनी केले. भानुदास गोवेकर आणि निलेश शेळके पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.बाबासाहेब सायमोते यांनी करून दिला. "युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास " या उद्देशाने हे श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये पाणी आडवा पाणी जिरवा, ग्रामस्वच्छता, आर्थिक अहवाल आरोग्य विषयी जनजागृती समाज प्रबोधन यासारखे उपक्रम राबविले जाणार आहेत.यावेळी महाविद्यालयातील सदस्य ग्रंथपाल नंदकुमार साळुंके, सदस्य प्रा. अमृता काळोखे शिक्षक शिक्षकेत्तर सेवक राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एम.डी. नायकु यांनी केले. मान्यवरांचे आभार डॉ.अनिल जगताप यांनी मानले व या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# आ. जोरगेवार यांनी केली महाकाली मंदिरात स्वच्छता

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनानुसार स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 22 जानेवारीला अयोध्या येथे श्री प्रभु रामाची प्राणप्रतिस्थापना करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. त्यांतर आज चंद्रपूरातील माता महाकाली मंदिर येथे आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यावेळी चंद्रपूर महानगरपालिका आयुक्त विपिन पालिवाल, महाकाली मंदिराचे विश्वस्त सुनिल महाकाले, माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, कोषाध्यक्ष पवण सराफ, मिलींद गंपावार, यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, बंगाली समाज महिला शहर प्रमुख सविता दंढारे, आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, करणसिंग बैस, तापोष डे, दिपक पदमगीरवार, विनोद अंनतवार, हेरमन जोसेफ, प्रकाश पडाल, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, अस्मिता डोणारकर, आशा देशमुख, चंदा ईटनकर, वंदना हजारे, अनिता झाडे, शांता धांडे, माधुरी बावणे, सतनाम सिंग मिरधा, शंकर दंतुलवार, ताहिर हुसेन, किशोर बोल्लमवार, नकुल वासमवार, मुकेश गाडगे, ॲड परमहंस यादव, बादल हजारे आदींची उपस्थिती होती. येत्या 22 जानेवारीला अयोध्येत आयोजित रामललाच्या प्राणप्रतिष्ठापनेची तयारी जोरात सुरु आहे. महाराष्ट्रातही 22 जानेवारीला राज्यभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान राज्यभरातील मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात यावे असे आवाहण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत आमदार किशोर जोरगेवार यांनीही मंदिरामध्ये स्वच्छता मोहिम सुरु केली असुन याची सुरुवात चंद्रपूरची आराध्य दैवत असलेल्या माता महाकालीच्या मंदिरातून करण्यात आली आहे. आज गुरुवारी सकाळी 8 वाजता आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत महाकाली मंदिर परिसर स्वच्छता मोहिमेला सुरवात करण्यात आली. यात चंद्रपूर महानगरपालिका प्रशासन, श्री महाकाली माता महोत्सव समिती, यंग चांदा ब्रिगेड सामाजिक संघटनेने सहभाग घेतला होता. यावेळी मंदिर परिसर संपूर्ण स्वच्छ करण्यात आला. स्वतः आमदार किशोर जोरगेवार यांनीही या मोहिमेत सहभाग घेत स्वच्छता केली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात स्वच्छता मोहिम सुरु केली आहे. मुंबई येथुन या माहिमेला सुरवात झाली. आपण विकासाची कामे करत असतो सोबतच स्वच्छता हा ही महत्वाचा विषय राहिला आहे. त्यामुळे शहर स्वच्छ करण्याच्या दृष्टीकोणातुन आज महाकाली मंदिर येथून या मोहिमेची सुरवात झाली आहे. माता महाकालीचे देवस्थान चंद्रपूकरांसाठी श्रध्दा स्थान आहे. येथे हजारो भाविक दररोज येत असतात. त्यामुळे हा परिसर स्वच्छ आणि सुंदर राहीला पाहिजे. या ठिकाणी आल्यानंतर मानसाला मन शांती मिळत असते. त्यामुळे या ठिकाणाहुन आम्ही या स्वच्छता मोहिमेची सुरवात करत असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले असून नागरिकांनीही या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेत आपले शहर स्वच्छ ठेवावे असे आवाहण यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी नागरिकांना केले आहे. तर उद्या सकाळी आठ वाजता काळाराम मंदिर येथे स्वच्छाता अभियान राबविण्यात येणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# देवळाना बु. येथील नदीवरील पूल होत नसल्याने शिक्षक, विद्यार्थ्यांना मोठा त्रास

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे देवळाना बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गिरिजा नदीच्या पलीकडे-गावाबाहेर दक्षिणेकडे असुण गत दोनतीन वर्षांपूर्वी नदीतील अर्धा पुल वाहून गेला आहे.तो काही करता होत नसल्याने शिक्षक पालक विद्यार्थी पशेतकऱ्यांना येजासाठी मोठा त्रास सहन करावे लागत असल्याचे चित्र आहे. विशेषता पावसाळ्यात.समाजसेवक पदाकऱ्यांनी सतत याबाबत काम करण्याची मागणी केली परंतु काही करता काम होत नसल्याने नागरिक हैराण परेशान झाले आहे.संबंधित वरिष्ठांनी याकडे लक्ष घालून अर्धे वाहून गेलेल्या पुल कामाची दुरुस्ती असी मागणी नागरिकांतून होत आहे. देवळाना बुद्रुक गाव एका बाजूसे व शाळा दुसऱ्या बाजूने नदीच्या पलीकडे आहे.येथे जिल्हा परिषद शाळेत गावांतील सर्वांचे मुलेमुली शिक्षक ज्ञानार्जन शिकवणी घेत आहे.परंतु दोनतीन वर्षांपूर्वी गिरिजा नदीला मोठा आल्याने पुरामुळे अर्धा पुल वाहून गेला तर अर्धा पुल तसाच उभा आहे.मात्र ते पुल ये जा साठी बंद आहे.शाळा दुसऱ्या बाजुस थडी उंचावर असल्याने दोन्ही बाजूंनी चढ उतारसाठी शिक्षक पालक विद्यार्थी शेतकऱ्यांना त्रासदायक ठरत आहे.तर पावसाळ्यात पुरपाण्यातून वाट काढताना मोठा त्रास सहन करावे लागते. यासंदर्भात गावकरी पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते यांनी सातत्याने प्रशासनाकडे प्रयत्न पाठपुरावा करुनही काहीच फायदा होत नाही. जो ना तो त्रास येथे सुरुच असल्याने नागरिक त्रस्त परेशान असुण वरिष्ठांनी याकडे लक्ष घालून तातडीने पावसाळ्यापूर्वी पुल काम मार्गी लावावे असी मागणी पालक विद्यार्थी शेतकरी शिक्षक यांच्याकडून होत आहे.



# 'हार्ट अटॅक'पासून बचावासाठी डॉ. रतन राठोड हेड कॉर्डियॉलॉजिस्ट यांचे मार्गदर्शन

## श्री शिवाजी विद्यालयात कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** सध्या हार्ट अटॅक हा शब्द फार चिंतेत टाकणरा झाला आहे. अतिशय सशक्त आणि सदृढ दिसणाऱ्या कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला हार्ट अटॅक आल्याची अनेक उदाहरणे आपल्या अवतीभोवती नियमित घडत आहेत. काही क्षणात परिवार उध्वस्त होत आहेत. हार्ट अटॅक कोणाला होऊ शकतो याची वैद्यकीय परिभाषा सामान्य माणसाच्या आवक्याबाहेर आहे.आणि अटॅक आला तर जीवन जगणं तेवढंच आवाक्याबाहेर आहे. परंतु थोडस प्रार्थमिक ज्ञान आणि दैनंदिन जीवनात अतिशय सहज आणि सोपे बदल केल्यास आपण हार्ट अटॅक टाळू शकतो म्हणजेच हार्ट अत्तक ला बाय बाय करू शकतो आणि अनेक उध्वस्त होणारे कुटुंब वाचवू शकतो याच उदात्त हेतूने ब्रह्माकुमारीज परिवार रिसोड , लॉयन्स क्लब रिसोड, डॉक्टर्स असोसिएशन रिसोड व मेडिकल असोसिएशन रिसोड



यांच्या संयुक्त विद्यमाने "बाय बाय टू हार्ट अटॅक" या हार्ट अटॅक टाळण्यासाठी मुंबई येथील एम जी मेडिकल कॉलेज चे हेड कॉर्डियॉलॉजिस्ट डॉ रतन राठोड यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम रविवार 21जानेवारी ला सकाळी 9:30 वाजता श्री शिवाजी विदयालय रिसोड च्या स्व. अप्पासाहेब सरनाईक सभागृहात आयोजित केला आहे. अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारी रुख्मिणी दीदी संचालिका ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र अकोला वाशीम.उदघाटक श्रीमती भूवनेश्वरी जिल्हाधिकारी वाशीम.विशेष अतिथी आमदार ऍड किरणराव सरनाईक सदस्य विधान परिषद, मुख्य मार्गदर्शक डॉ रतन राठोड मुंबई,प्रमुख अतिथी प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार रिसोड,देवेंद्रसिंग ठाकूर पोलीस निरीक्षक, सतीश शेवदा मुख्याधिकारी नगर परिषद,डॉ. अरुणराव देशमुख अध्यक्ष डॉक्टर्स असोसिएशन रिसोड,डॉ. माधव मस्के अध्यक्ष लॉयन्स क्लब रिसोड,हरिभाऊ खोडके अध्यक्ष मेडिकल असोशिएसन रिसोड, ब्रह्माकुमारी ज्योती दीदी संचालिका ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र रिसोड इत्यादी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. डॉ.रतन राठोड यांच्या अतिशय व्यस्त दिनचर्येंतून त्यांचा बहुमूल्य वेळ रिसोडकराना हार्ट अटॅक पासून बचाव होण्यासाठी देत आहेत. हे मार्गदर्शन विनशुल्क राहणार आहे आणि स्वतःच्या व परिवाराच्या आरोग्याच्या दृष्टीने हे मार्गदर्शन महत्वपूर्ण ठरणार आहे तरी सपरिवार येऊन हार्ट अटॅक ला कायमच बाय बाय करण्यासाठी सहपरिवार कार्यक्रमाला वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. माधव मस्के अध्यक्ष लॉयन्स क्लब रिसोड यांनी केले आहे.

# स्वभाषाभिमान म्हणजे इतर भाषांचा तिरस्कार नव्हे : धनंजय गुडसूरकर

आधुनिक केसरी न्यूज

**उदगीर :** स्वभाषा ही केवळ संवादाचे साधन नसून भाषेमुळे येणारे भान मानवाला घडविणारे असते, स्वभाषाभिमान म्हणजे इतर भाषेविषयी तिरस्कार असणे नव्हे, आपल्या भाषेला जगविण्यासाठी स्वभाषाभिमानाचा दीप प्रज्वलित ठेवण्याची गरज आहे , भाषिक संवर्धनाची जबाबदारी केवळ शासनाची नाही तर आम्हीच मराठीचे संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे "असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा महाराष्ट्र राज्य व साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसुरकर यांनी व्यक्त केले.* ते महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म.ए. सोसायटीचे सचिव रामचंद्र तिरुके होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, नायब तहसीलदार संदीप हाडगे, डॉ.गजेंद्र राठोड, प्रा. जे.आर.कांदे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना गुडसूरकर म्हणाले की माय मराठी कमकुवत होत असेल तर तिच्या संवर्धनाची जबाबदारी देखील दुसऱ्यांना दोष देऊन होणार नाही. मराठी भाषेच्या गतवैभवासाठी समाजातील सर्व स्तरातील घटकांनी पुढे येणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी भाषा संवर्धन पंधरवाडा सारखे उपक्रम आपल्याला आपल्या भूमिकेची जाणिव करुन देतात. केवळ मराठीची गौरव गीते गाऊन नव्हे तर दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढवून आपण भाषेप्रती कृतज्ञ राहण्याची गरज गुडसूरकर यांनी व्यक्त केली . संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.प्रकाश तोंडारे यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यास शुभेच्छा दिल्या. भाषा



माणसांना जोडण्याचे कार्य करते, असे मत प्राचार्य डॉ.आर.के.मस्के यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना सचिव रामचंद्र तिरुके म्हणाले, आपल्या परिसरातील भाषेचे संकलन केले तरी देखील खूप मोठ्या प्रमाणात मराठी भाषेतील वैविध्य आपल्याला समजून येईल. भाषा एक असते पण त्याची रूपे अनेक असतात. त्यामुळे उदयगिरीत मातृभाषेबरोबरच सर्व भाषेचे संवर्धन करण्यावरती भर देण्यात आला आहे. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.दीपक चिद्दरवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.अर्चना मोरे यांनी तर आभार प्रा. डॉ.बी.आर.दहिफळे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ.गौरव जेवळीकर, प्रा. प्रवीण जाहुरे, प्रा. गोपाळ पाटील, प्रा.डॉ. पी. व्ही. काळे व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# मनपा शालेय क्रीडासत्राचा उद्‌घाटन सोहळा उत्साहात

## १७०० विद्यार्थ्यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिका संचालित २७ शाळांचे शालेय क्रीडासत्राचे उदघाटन १६ जानेवारी रोजी कोहिनुर क्रीडांगण येथे उपायुक्त मंगेश खवले व जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) यांच्या हस्ते संपन्न झाले.

यាप्रसंगी उपायुक्त यांनी मनपाच्या शाळांची पटसंख्या वाढल्याचे तसेच विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व कौशल्यरित्या सादर केलेल्या शो ड्रिलचे कौतुक केले. क्रीडासत्रात मनपाच्या २७ शाळांचे १७०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ३ दिवसीय क्रीडासत्रात खो-खो,कबड्डी,गोळा फेक, रीले रेस, लांब उडी, वैयक्तीक कौशल्य इत्यादी विविध मैदानी खेळ खेळले जाणार आहेत. ३ दिवस विद्यार्थ्यांच्या भोजनाची तसेच मध्यान्हात दुध देण्याची व्यवस्था मनपातर्फे येणार आहे.

रैयतवारी कॉलरी मराठी प्राथ. शाळा,भा. डॉ. भीमराव आंबेडकर शाळा, पंडित जवाहरलाल नेहरू प्राथ. शाळा यांच्यातर्फे शो ड्रील तर सावित्रीबाई फुले उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांतर्फे स्वागत गीत सादर करण्यात आले तसेच लेझीम, बलुन ड्रील, समुह गान प्रस्तुत करण्यात आले. यावेळी शिक्षकांद्वारे विद्यार्थ्यांना खेळभावनेची तर आयुक्तांद्वारे पंचांना निष्पक्षतेची शपथ देण्यात आली. संचालन स्वाती बेत्तावार,उमा कुकडपवार यांनी तर सुनील आत्राम यांनी आभार प्रदर्शन केले.

यាप्रसंगी शहर अभियंता अनिल घुमडे, प्रशासन अधिकारी नागेश नीत, जिल्हा समन्वयक रवी तामगाडगे, क्रीडा प्रमुख कार्यवाह उमेश आत्राम, वामन कुमरे, सय्यद शहजाद, अरुण वलके,मधुकर मडावी, शरद शेंडे, रवींद्र गोरे, राजकुमार केसकर, अमोल कोटनाके, प्रशांत आकनुरवार, शिवलाल इरपाते, भुषण बुरटे, संदीप जवादवार, सुचिता मालोदे, संजना पिंपळशेंडे, परिणय वासेकर, बबिता उईके,विद्यालक्ष्मी कुंडले,रामकुमार हिवारे उपस्थीत होते.



# नमोचषक-२०२४ साठी खेळाडूंनी सहभाग नोंदवावा

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील होतकरू खेळाडूंनी नमो चषक २०२४ साठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा द्वारा आयोजित स्पर्धेत विविध क्षेत्रातल्या खेळाडूने सहभाग नोंदवून आपल्या क्रीडा गुणाचे सादरीकरण करून आपले प्रगल्भ ज्ञान समाजापुढे सादर करावे असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर जिल्हाउपाध्यक्ष शेख अझहरोदिन सलीमोदिन यांनी तालुक्यातील युवकांना केले आहे. भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा द्वारा आयोजित क्रीडा स्पर्धेत कबड्डी, हॉलीबॉल, क्रिकेट, खो खो, धावणे स्पर्धा, लांब उडी, उंच उडी,रांगोळी, चित्रकला अशा विविध खेळांचा या स्पर्धेत समावेश आहे. तरी खुलताबाद तालुक्यातील सर्व होतकरू खेळाडूंनी यात सहभाग घेऊन नमो चषक २०२४ चे मानकरी बनन्यासाठी प्रयत्नशील असावे असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर जिल्हाउपाध्यक्ष शेख अझहरोदिन सलीमोदिन यांनी व्यक्त केले आहे. यावेळी उपस्थित भाजयुमो जिल्हा सरचिटणीस किरण बोडखे, जिल्हा सचिव अमोल गवळी, भाजयुमो खुलताबाद तालुकाध्यक्ष सतीश पाटील खंडागळे, युवा मोर्चा मा शहराध्यक्ष गणेश पाटील बारगळ,भाजपा शहर उपाध्यक्ष उमेश आवारे आदिची उपस्थिती होती.

# अग्रवाल विद्यार्थी शिक्षण मंडळातर्फे कृत्रिम अवयव वाटप

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** कृत्रिम अवयव प्राप्त झाल्यानंतर एक नवा जन्म मिळाल्याची भावना दिव्यांगांच्या मनात निर्माण होते. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमलते. दिव्यांगांच्या चेहऱ्यावरील हे हास्यच आमच्यासाठी मोठा आनंद व समाधान देणारे आहे अशा भावना मान्यवरांनी दिव्यांगांना कृत्रिम वाटप अवयव वाटप कार्यक्रमात व्यक्त केल्या. या कार्यक्रमात २७० दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटप करण्यात आले.

अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळ, धुळे यांच्यातर्फे उदयपूर येथील नारायण लिम्ब व कॅलिपर्स फिटमेंट शिबिर गुरुवारी दिनांक १८ जानेवारी रोजी धुळे शहरातील अग्रवाल विश्राम भवन येथे झाले. या शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी उद्योगपती महेश मित्तल, नाशिक, ताराचंद गुप्ता, विनोद मित्तल, अनुप ओमप्रकाश अग्रवाल, अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष ओमप्रकाश अग्रवाल, सचिव दिनेश गिंदोडीया, खजिनदार पीयूष अग्रवाल, व्यवस्थापक विक्रम केडीया, नारायण सेवा संस्थानचे हरिप्रसाद लड्ढा, अग्रवाल समाजाचे अध्यक्ष जगदीश गिंदोडीया, श्रीमती भारती आदी मान्यवर उपस्थित होते. उद्‌घाटन कार्यक्रमाला ओमप्रकाश अग्रवाल म्हणाले की, अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळातर्फे विविध उपक्रम राबविले जातात. दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटप कार्यक्रम हा अत्यंत चांगला उपक्रम मंडळातर्फे घेण्यात येत आहे. दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटपातून त्यांच्या चेहऱ्यावर जे हास्य उमलते ते आमच्यासाठी समाधान देणारे व उपक्रम राबविल्याचे सार्थक झाल्याचे दिसते. कृत्रिम अवयव मिळाल्याने दिव्यांगांना नवा जन्म मिळाल्याचा आनंद मिळतो. महेश मित्तल म्हणाले, की संस्थेतर्फे अत्यंत चांगला उपक्रम राबविण्यात येत आहे. अशा प्रकारचे कार्यक्रम आम्ही देखील घेतो मात्र, एवढ्या मोठ्या स्वरूपात हा कार्यक्रम आनंद देणारा आहे. अग्रवाल समाज असे समाजोपयोगी कार्यक्रम घेत असल्याचाही आनंद आहे. हरिप्रसाद लड्ढा यांनी नारायण संस्थानच्या कार्याविषयी माहिती दिली. ते म्हणाले, की संस्थानतर्फे गेल्या ३९ वर्षात दिव्यांगांसाठी कार्यक्रम घेण्यात येत आहेत. आत्तापर्यंत चार लाखांवर दिव्यांगांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. ज्या दिव्यांगांना कृत्रिम अवयवाची, शस्त्रक्रियेची गरज आहे, त्यांनी थेट उदयपूरला जरी आले तरी त्यांचे स्वागत आहे. संस्थांनतर्फे त्यांना संपूर्ण सहकार्य व मदत केली जाईल. नाराणय संस्थांन दिव्यांगांसाठी समर्पित असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थानचे संस्थापक चेअरमन कैलाश मानव यांच्या कार्याविषयी देखील त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमात २७० दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटप करण्यात आले तसेच निवड झालेल्या १७ दिव्यांगांवर शस्त्रक्रिया करण्याची कार्यवाही सुरू असल्याचेही ते म्हणाले. या कार्यक्रमात मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# दोन पोलीस कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज





**धुळे :** पोलीस निरीक्षक रूपाली खांडवी यांनी संपूर्ण पथकाद्वारे सापळा रचून देवपूर पोलीस स्टेशनचे प्रभारी उपनिरीक्षक व हेड कॉन्स्टेबल यांना 5000 ची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. तक्रारदार यांच्या शेतीमाल वाहतुकीचे ट्रॅक्टर देवपूर पोलीस स्टेशन हद्दीत मुंबई आग्रा महामार्गावर अपघात झाले होते या घटनेबाबत मोटर अपघात दाखल करून अपघात ग्रस्त वाहन सोडून देण्यासाठी तक्रार यांच्याकडून हरिश्चंद्र पाटील पोलीस उपनिरीक्षक व रविंद्र मोराणीस पोलीस हेडकॉन्स्टेबल यांनी 5000 रु लचेची मागणी केली होती लाच रक्कम ही यांनी पंचायत समक्ष स्वीकारल्याने त्यांना रंग हात पकडण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध देवपूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्रीमती शर्मिष्ठा घारगे -वालावलकर मॅडम पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि, नाशिक परिक्षेत्र नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक अभिषेक पाटील यांच्या आदेशाने राजन कदम, मुकेश अहिरे, प्रवीण मोरे, संतोष पावरा, रामदास बारेला, प्रशांत बागुल, मकरंद पाटील, प्रवीण पाटील,सुधीर मोरे,जगदीश बडगुजर अशांनी केली आहे.

# मालमत्ता कराची आकारणी दुपटीपेक्षा जास्त करू नये : प्रधान सचिवांचे आदेश

## आ.फारुख शाह यांच्या अथक प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालीकेच्यावतीने शहरातील मालमत्तांसाठी घरपट्टीत मोठ्याप्रमाणात वाढ केली आहे. परिणामी धुळेकर नागरीकांमध्ये असंतोष पसरलेला आहे.हि बाब लक्षात घेवून आ. फारुख शाह यांनी हिवाळी अधिवेशनाच्या काळात नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंद राज यांची भेट घेवून त्यांच्यासमोर धुळेकर नागरिकांची कैफियत मांडली होती.आ.फारुख शाह यांनी मांडलेली धुकरांची व्यथा लक्षात घेवून प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी महानगरपालीकेने आकारलेल्या वाढीव घरपट्टीचा प्रश्न निवारण्यासाठी दि.२ जाने.रोजी प्रधान सचिव यांच्या दालनात बैठक घेतली होती.



धुळे शहर हे अति मागास आर्थिक दृष्ट्या शहर असून या शहरात मोठमोठे उद्योग धंदे नसल्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. तसेच धुळे शहर हे मागासलेले असल्यामुळे शहरातील नागरिकांना वाढीव घरपट्टी भरणे जिकरीचे होत आहे. धुळे शहर हद्द वाढ झाल्यामुळे शहरावर विकास कामाच्या मोठा बोजा आहे, तसेच शासनाचा निधी कमी पडत असल्यामुळे शहराच्या विकास होत नाही. शहरातील एम.आय.डी.सी. येथे जास्त उद्योग धंदा नसल्यामुळे शहरातील असंख्य नागरिक बेरोजगार आहेत. शहरात यापूर्वी सुद्धा घरपट्टी वाढ करण्यात आलेली होती व आज सुद्धा मोठ्या प्रमाणात नागरिकांकडून घरपट्टी वसूल केली जात आहे. परंतु ही घरपट्टी वाढ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे गरीब नागरिकांना भरणे अशक्य होत आहे तरी शहराची परिस्थिती पाहता ज्याप्रमाणे महानगरपालिका ने ठराव करून घरपट्टी वाढ केलेली आहे ती घरपट्टी वाढ आपल्या स्तरावर रद्द करून वाजवी अशी घरपट्टी लावण्यात यावी अशी मागणी आ.फारुख शाह यांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंद राज यांची समक्ष भेट घेवून केली होती. त्यानुसार महानगरपालीकेने आकारलेल्या वाढीव घरपट्टीचा प्रश्न निवारण्यासाठी मंगळवारी दि.२जानेवारी रोजी प्रधान सचिव यांच्या दालनात बैठक घेतली होती.या बैठकीत अनेक पटीने वाढ केलेली घरपट्टी रद्द करण्यात यावी आणि धुळे शहरातील मालमत्तांसाठी कराची आकारणी दुपटीपेक्षा जास्त करू नये असे स्पष्ट निर्देश नगर विकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज यांनी यावेळी दिलेत.आ.फारुख शाह हे गेल्या अनेक दिवसापासून धुळेकरांवर लादलेल्या वाढीव घरपट्टी ची आकारणी कमी व्हावी यासाठी प्रयत्नरत होते. शासन दरबारी सातत्याने धुळेकरांची व्यथा मांडल्यामुळे शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन धुळेकरांना दिलासा दिलेला आहे. वाढीव घरपट्टी ची आकारणी कमी करण्यात आल्याने धुळेकर नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून आ.फारुख शाह यांना धन्यवाद दिले आहे.

# साखरखेर्डा येथील अर्जुन गवई यांना शैक्षणिक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**



**बुलढाणा :** साखरखेर्डा येथील माजी सैनिक तथा ग्रामसेवक असलेले अर्जुन गवई यांना सन २०२४ सालचा शैक्षणिक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या 28 जानेवारीला मलकापूर येथील आत्मानंद दरबार हॉलमध्ये दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत सदर पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. अर्जुनराव गवई यांनी अठरा वर्ष देश सेवा केली. त्यानंतर सेवानिवृत्त झाल्यानंतर सामाजिक कार्याकडे त्यांनी वाटचाल केली. तथागत सामाजिक संस्थेच्या माध्यमातून त्यांनी गरजू लोकांना अन्नधान्य वाटप त्याचप्रमाणे कोरोना काळात त्यांनी किराणाचे वाटप केले. साखरखेर्डा गावामध्ये शैक्षणिक दालन उभे केले ,अनिकेत सैनिक हायस्कूल,लक्ष करिअर अकॅडमी,ख्वाजा उर्दू जुनियर कॉलेज,प्रतिभा गवई कला महाविद्यालय , एन एस एफ कॉलेज ,अशी विविध प्रकारचे शैक्षणिक दालन विद्यार्थ्यांना करता त्यांनी उघडे केली आहे. याच कार्यांची दखल घेत दैनिक विश्व जगत परिवाराने त्यांना उत्कृष्ट शैक्षणिक पुरस्कार जाहीर केला आहे, डॉ. सुकेश झंवर, माजी राज्यमंत्री बच्चू कडू, माजी मंत्री एकनाथराव खडसे खासदार रक्षाताई खडसे, विद्याधर महाले खाजगी सचिव उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आ. राजेश एकडे, आ. संजय गायकवाड, आ . आकाश फुंडकर, जयश्रीताई शेळके, पराग सराफ, रविकांत तुपकर शेतकरी नेते , शिवचंद्र तायडे, हरिष रावळ,जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने, यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# पुलावर लावलेले अँगल अज्ञात चोरट्यांनी नेले कापून

## तिन्ही पुलांचे काम पूर्ण करावे : नागरिकांनी व्यक्त केल्या अपेक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** अतिशय महत्त्वाचा वर्दळीचा रस्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साखरखेर्डा ते लव्हाळा रस्त्यावरील सवडद फाट्यासमोर अवघ्या हाकेच्या अंतरावर असलेल्या पुलावर कठडे म्हणून मोठमोठाले लोखंडी अँगल लावलेले होते ,परंतु ते लोखंडे अँगल अज्ञात चोरट्यांनी नादुरुस्त पूल असल्यामुळे व कुठलीही यंत्रणा त्या ठिकाणी कार्यान्वित नसल्यामुळे याचा फायदा घेत पुलावर असलेले मोठाले लोखंडे अँगल राँडच्या सह्याने कापून नेले आहे. त्यामुळे पुलाचे काम अर्धवट असल्यामुळे या ठिकाणी संबंधित काम करणाऱ्या ठेकेदारांनी सर्व पसारा घेऊन उभारा केला आहे, साखरखेर्डा ते लव्हाळा हा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

या रस्त्याने चिखली बुलढाणा मेहकर खामगाव अकोला जाण्याच्या दृष्टीने या रस्त्याने वाहने जात असतात. साखरखेर्डा येथील भोगावती नदीवर असलेल्या पुलाचे काम सुद्धा बाकी असून शिंदी ते साखरखेर्डा या रस्त्यावर फक्त मुरूम टाकला आहे, तर सोडत फाट्यावरील पुलाचे काम सुद्धा अर्धवटच आहे फुलावर असलेले तार उघडे पडले असून अनेक वाहने या ठिकाणी घसरत आहे,

तर सवडह फाट्यावरून जवळच असलेल्या पुलावर सुद्धा फक्त गिट्टी टाकलेली आहे व याच पुलावर असलेले मोठाले अँगल चोरून नेले आहे. त्यामुळे लोकसभेच्या तोंडावर तरी या तिन्ही पुलाचे काम पूर्ण करावे अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.





# आम आदमी पार्टी राज्यातील सर्व निवडणुका ताकदीने लढणार

## आप प्रचार प्रमुख रंगा दादा राचुरे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आम आदमी पक्ष हा देशातील राजकीय इतिहासात अत्यंत झपाट्याने वाढणारा पक्ष असून राज्यातील सर्व निवडणुका आम आदमी पार्टी ताकदीने लढणार असल्याचे प्रतिपादन आम आदमी पार्टीचे प्रचार प्रमुख रंगा दादा राजुरे यांनी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित पक्षाच्या आडवा बैठकीत केले.

राज्यातील आणि देशातील लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आम आदमी पार्टीने इंडिया आघाडीसोबत आघाडी स्थापन केली आहे. लोकशाहीच्या हितासाठी आम आदमी पार्टी ही राज्यातील लोकसभा, विधानसभा, नगरपालिका महानगरपालिका जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका ताकदीने लढणार असून आम आदमी पार्टीकडे 200 पेक्षा जास्त राज्यातील ग्रामपंचायत मध्ये सदस्य आहेत. 30 पेक्षा जास्त ग्रामपंचायती आम आदमी पार्टीच्या ताब्यात आहेत.

राज्यात 25 हजार पेक्षा जास्त मोठ्या कार्यकर्त्यांची फळी तयार आहे. मात्र शासन निवडणुका घ्यायला घाबरत असल्याने आम्हाला आमची ताकद दाखवता आली नाही. तरी येणाऱ्या 2024 च्या सर्व निवडणुका आम आदमी पार्टी राज्यामध्ये ताकदीने लढणार असून कार्यकर्त्यांनी "कामाला लागावे" असेही यावेळी श्री रंगा दादा राचूरे यांनी कार्यकर्त्यांना सांगितले .ते राहुल कल्चरल हॉल येथे आयोजित पक्षाच्या आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आप च्या महिला प्रदेशाध्यक्ष सीमाताई गुट्टे, राज्य सहसचिव वैजिनाथ राठोड, राज्य महिला सहसचिव ज्योतीताई जाधव, महाराष्ट्र राज्य प्रदेश युवा संघटनमंत्री सतीश देवेंद्र लोखंडे वेरुळकर, जिल्हाध्यक्ष सुभाष निकम, शहराध्यक्ष इमरान शेख उस्मान, शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष सलीम शेख, अल्पसंख्यांक आघाडी जिल्हाध्यक्ष सलाहुद्दीन नेहरी, वाहतूक आघाडी जिल्हाध्यक्ष खाजा किस्मतवाला,जिल्हा संघटन मंत्री संजय चव्हाण यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गुंठेवारी प्रकरणातील नागरिकांना मिळणार महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजनेचा लाभ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शासनाने सुरू केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजनेचा लाभ गुंठेवारी प्रकरणातील नागरिकांनी घेण्याचे आवाहन मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांनी केले आहे.

चंद्रपूर शहरातील जी गुंठेवारी प्रकरणे आहेत त्यात बहुतांश व्यवहार हे नोटरीद्वारे केले गेले आहेत. ज्या नागरिकांनी गुंठेवारी प्रकरणात नोटरीद्वारे व्यवहार केलेले आहेत त्यांना नियमित करण्याची संधी महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजनेद्वारे मिळत आहे. महाराष्ट्राच्या राजपत्रात अधिसूचित केलेल्या ७ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन आदेशाच्या अनुषंगाने महसूल व वनविभागाने ११ डिसेंबर रोजी परिपत्रक काढून या योजनेबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना जारी केल्या आहेत.

१ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २००० या सालामध्ये निष्पादित केलेल्या दस्तांमध्ये कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम १ लाख रुपयांपेक्षा कमी असेल अशा दस्तांवरील कमी भरलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क माफ करण्यात येऊन व त्यावरील दंडाची रक्कम देखील संपूर्णपणे माफ करण्यात आली आहे. तर, कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम ही १ लाखापेक्षा जास्त असलेल्या प्रकरणात कमी भरलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये ५० टक्के सुट देऊन त्यावरील दंडाची संपूर्ण रक्कम माफ करण्यात आली आहे.

तसेच १ जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये निष्पादित केलेल्या दस्तांच्या बाबतीत कमी भरलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये २५ टक्क्यांपर्यंत सूट आणि दंड हा नाममात्र २५ लाख ते १ कोटी रुपये मर्यादेपर्यंतच वसूल करण्यात येणार आहे. दंडाची रक्कम त्यापेक्षा जास्त असल्यास ती संपूर्णपणे माफ केली जाणार आहे.

मुद्रांक शुल्क अभय योजनेचा लाभ घ्यायचा असल्यास मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत दस्त हा कोणत्याही रक्कमेच्या मुद्रांक पेपरवर निष्पादित झालेला असणे अनिवार्य आहे. त्याशिवाय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराला अर्ज करता येणार नाही.

यासंबंधी आढावा बैठक मनपा कार्यालयात १२ जानेवारी रोजी मनपा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील,सहायक संचालक नगर रचना सुनील दहीकर, सहायक जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी अंकिता तांदुळे,भूमि अभिलेख उपअधिक्षक मिलिंद राऊत,सहायक दुय्यम निबंधक बीएन माहोरे,नरेंद्र बोके सहायक नगर रचनाकार सारिका शिरभाते उपस्थित होते.



# यशस्वी उद्योजिका म्हणून महिला राष्ट्राच्या पुनर्निर्माणामध्ये मोलाचे योगदान देऊ शकतात

## मोटिव्हेशनल ट्रेनर प्राध्यापक शाम हेडाऊ यांचे प्रतिपादन



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** उद्योजकते विषयीचे आवश्यक असे सर्व व्यवस्थापन कौशल्य महिलांमध्ये ठासून भरलेले असतेच. याच कौशल्याच्या बळावर महिला स्वतःच्या कुटुंबाचं नियोजन आणि व्यवस्थापन करीत असते. हीच कौशल्य उद्योग आणि व्यवसायाच्या क्षेत्रात वापरल्यास महिला एक यशस्वी उद्योजिका म्हणून राष्ट्राच्या पुनर्निर्मानामध्ये मोलाचे योगदान देऊ शकतात, असे प्रतिपादन मोटिव्हेशनल ट्रेनर प्राध्यापक शाम हेडाऊ यांनी केले.

महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियाना द्वारे आयोजित तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, मूल अंतर्गत बिगर शेती आधारित प्रशिक्षण वर्गात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तालुका अभियान व्यवस्थापक नितीन वाघमारे, ब्लॉक क्लस्टर कॉर्डिनेटर, जयश्री खोब्रागडे कार्यरत तज्ञ सत्यवान मोगरकर आदि उपस्थिती होते.

समुदाय संचालित प्रशिक्षण केंद्र मुल येथे नुकतेच या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले असून, सहा दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षण केंद्रामध्ये मुल तालुक्या अंतर्गत येणाऱ्या महिला उद्योजकांना उद्योग व्यवसाय वाढीच्या दृष्टिकोनातून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यावेळी पुढे बोलताना प्राध्यापक शाम हेडाऊ यांनी व्यवसायाच्या क्षेत्रामध्ये वेळेचे नियोजन कसे महत्त्वाचे असते व वेगवेगळ्या उद्योगांच्या संधी कशा निर्माण होत जातात किंवा उद्योजकांनी व्यवसायाच्या नवनवीन संधी कशा निर्माण कराव्यात, ग्रामीण भागातील व्यवसायाच्या विविध संधी, त्यासाठी आवश्यक असे कौशल्य, उद्योगाच्या क्षेत्रात संवाद कौशल्याचे महत्व आशा विविध विषयांवर उपस्थित सर्व महिलांना मार्गदर्शन केले. तालुका अभियान व्यवस्थापक नितीन वाघमारे यांनी या प्रशिक्षणाच्या आयोजना मागची भूमिका, उद्देश सांगत त्या प्रशिक्षणाचे महत्त्व उपस्थित महिलांना पटवून दिले. या प्रशिक्षणातून महिलांनी स्वतःचा स्वयंरोजगार वाढवत आपल्या कुटुंबाच्याही उदरनिर्वाहासाठी महिलांनी पुढे यावे असा हा काळ असल्याचे नमूद केले. ब्लॉक क्लस्टर कॉर्डिनेटर जयश्री खोब्रागडे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यरत तज्ञ सत्यवान मोगरकर आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



# निकृष्ट दर्जाच्या पुलाच्या कामाची चौकशी करा

## ठेकेदारावर कारवाई करा : एमआयएमची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** साखरखेर्डा ते लव्हाळा रस्त्यावरील बांधण्यात आलेल्या तीन नवीन पुलाच्या कामाची निकृष्ट दर्जांच्या कामाची चौकशी करून साहित्यसह पळून गेलेल्या ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी एमआयएम वतीने दिनांक १७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की संबंधित ठेकेदाराने साखरखेर्डा येथील भोगावती नदीवर सुद्धा नवीन पूल बांधलेला आहे परंतु या पुलाचे काम अजूनही २५ % टक्के बाकी आहे दर्गा जवळ कुठल्याही प्रकारचे कठवडे लावलेले नाहीत ,त्याचबरोबर साखरखेर्डा रस्त्याला जोडणाऱ्या शिंदी ते साखरखेर्डा या रस्त्यावर फक्त मुरूम टाकलेला आहे फक्त उखडून ठेवलेला आहे यावर कुठल्याही प्रकारचे सिमेंट टाकलेले नाही तसेच सवडद फाट्यावर सुद्धा संबंधित ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे पुलाचे काम केलेल्या असून पुलावर टाकण्याकरता तारेचे कुंपण टाकलेले आहेत ते तारेचे कुंपण तसेच असून अनेक वाहनधारकांना अडथळा निर्माण करत आहेत अनेकांच्या वाहनांचे टायर यामुळे फुटलेले आहे, तसेच मोहखेड गावाजवळ सुद्धा पुलाचे काम अर्धवटच आहे त्यामुळे सदर तिन्ही पुलांचे निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करावी व तसेच अर्धवट काम सोडून पळून गेलेल्या ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी सुद्धा जिल्हाअधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर एमआयएमचे जिल्हाध्यक्ष डॉ. मोबीन खान, जिल्हा सचिव मोहम्मद शिफात, शेख अकिल शहराध्यक्ष, बुलढाणा, एमआयएमचे शहराध्यक्ष साखरखेर्डा असलम शहा, शहर महासचिव आशिफ कुरेशी यांच्या सहया आहेत.

# पांझरा नदीपात्रात ६० फूट उंच श्रीराम मंदिराची उभारणी

## अनुप अग्रवल यांची पत्रपरिषदेत माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अयोध्येत उभारल्या गेलेल्या प्रभु श्रीरामांच्या मंदीराची प्रतिकृती धुळे शहरातील पांझरा नदीपात्रात कालिकादेवी मंदीराजवळ उभारली जात आहे. यासंदर्भात अनुप अग्रवाल यांनी मंगळवार दि. १६ जानेवारु रोजी मंदीर उभारणीस्थळी पत्रकार परिषद घेवून सविस्तर माहिती दिली.

भाजपा धुळे शहर विधानसभा क्षेत्रप्रमुख अनुप अग्रवाल हे आपल्या पक्षाचे नाव व पद न लावता केवळ एक हिंदु श्रीरामभक्त म्हणून या मंदीराची उभारणी करीत आहेत. यासाठी कुणाकडूनही एक पैसा न घेता सर्व खर्च अग्रवाल स्वतः करीत आहेत. थर्माकोलच्या साहाय्याने उभारले जात असलेले हे मंदीर ६० फूट उंच असेल. मदीर निर्मिती साकारत असलेले सर्व कारागीर हे धुळ्यातील स्थानिक रहिवाशी आहेत. यासाठी रात्रंदिवस वेगात काम सुरु आहे. या स्थळाला तात्पुरते अयोध्याधाम नाव देण्यात आले आहे. अयोध्येत स्थापित केली जाणारी श्रीरामांची मुर्तीची प्रतिकृती या अयोध्याधाममध्येही स्थापित केली जाणार आहे. तत्पूर्वी २१ जानेवारीला या मुर्तीची आग्रा रोडवरील छत्रपती शिवरायांच्या मंदीरापासून अयोध्याधामपर्यंत वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर २२ ते ३१ जानेवारीदरम्यान मंदीर दहा दिवस भाविकांना दर्शनासाठी खुले असेल. या दहा दिवसांदरम्यान दररोज सकाळ सायंकाळ महाआरतीसह सायंकाळी भजनसंध्या व विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. परिसरात यात्रेतील पाळणे लावले जात आहेत. आतषबाजीही केली जाणार आहे. यासाठी रेडीमेड फटाके न घेता बनवून घेतले जात आहेत. अयोध्येत २२ जानेवारीला उपस्थित राहून पुजाविधी करणारे पुरोहितांपैकी काही पुरोहितांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य धर्मसभेने या कार्यक्रमांची सांगता होईल अशी सविस्तर माहिती अनुप अग्रवाल यांनी दिली.



# साहित्य संमेलनात अय्युब पठाण यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** ऐतिहासिक पहिले मराठवाडा बालकुमार साहित्य संमेलनात पैठण येथे पार पडलेल्या कार्यक्रमात प्रसिध्द बाल साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा अयोजकांच्या वतीने कवी संमेलनाच्या कार्यक्रमात सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व शाल, पुस्तक देऊन पठाण यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. अय्युब पठाण लोहगांवकर यांनी पंधरा वर्षापासून बाल- किशोर- कुमारांसाठी भरीव योगदान करून आता पर्यंत बालकांसाठी बारा पुस्तकांचे दर्जेदार व सुसंस्कारीत बालसाहित्यावर लेखन केलेले असून त्यांची " पाणपोई " ही कविता बालभारतीच्या इयत्ता सहवीच्या हिंदी. इंग्रजी- सी.बी.एस.ई. माध्यमाला अभ्यासक्रमात आहे. म्हणून अय्युब पठाण लोहगावकर यांची या कार्याची दखल घेऊन संमेलन आयोजक तथा स्वागत अध्यक्ष प्रा. संतोष तांबे आणि संमेलन अध्यक्ष सुरेश सावंत यांनी पठाण यांचा सन्मान करून पुढील साहित्य लेखनास अय्युब पठाण लोहगांवकर यांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी म.सा.प. अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील, उपाध्यक्ष किरण सगर,कार्यवाह डॉ. दादा गोरे, कोषाध्यक्ष कुंडलिक अतकरे, भास्कर बढे, प्रख्यात साहित्यिक ऋषिकेश कांबळे, यांची कार्यक्रामास विशेष उपस्थिती होती.







# राष्ट्रवादीच्या जिल्हा सरचिटणीसपदी डॉ. माधवराव जाधव यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा सरचिटणीस पदी डॉ. माधवराव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या धोरणानुसार जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी सदर नियुक्ती केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या विचारांशी एकनिष्ठ असलेले डॉ. जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हयात पक्षासाठी कार्यरत आहेत. त्यांचा सर्वसामान्य लोकांसोबत असलेला दांडगा जनसंपर्क पक्ष मजबूत करण्यासाठी उपयुक्त ठरेल या अपेक्षेने त्यांची सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. यावेळी राष्ट्रवादीचे निरीक्षक प्रा.कांबळे, प्रदेश सरचिटणीस मा.आ. अनंत कुमार पाटील, डॉ. भगवानराव गोटे, प्रा.गायकवाड, कैलासराव खानझोडे, अनंत काळे,डॉ. रमेश चंदनशिव, इमरान फकिरावाले आदीसह अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# कष्ट-त्याग-समर्पणाचीच गाथा म्हणजेच 'अग्निदिव्य'

## प्रदीप माने : आशिष निनगुरकर यांच्या 'अग्निदिव्य' पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** युवालेखक व डाक कर्मचारी आशिष निनगुरकर हे एक अत्यंत प्रतिभावंत लेखक व कवी असून त्यांच्या "अग्निदिव्य" या चरित्र पुस्तकातून एका स्त्रीचा स्वतःच्या आस्तित्वासाठी व स्वतःच्या मुलाला हक्क तसेच न्याय मिळवून देण्यासाठी दिलेला लढा, एक संघर्ष या पुस्तकातून वाचायला मिळेल. आमच्या कार्यालयात काम करणारा सहकारी अभिषेक व त्याची आई रमाबाई यांच्या जीवनावर आधारीत एक वास्तव व काळीज पिळवटून टाकणारी कहाणी या पुस्तकातून आशिष यांनी अत्यंत सहजसोप्या शब्दांत मांडली आहे. हे पुस्तक वाचल्यावर नक्कीच अंगावर शहारे आल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्या डाक कार्यालयात असे हरहुन्नरी कलाकार असल्याने आम्हा सहकाऱ्यांना देखील वाचनाबरोबर जगण्याची एक नवी उमेद व ऊर्जा मिळते. 'चपराक प्रकाशन' मुळे दर्जेदार लेखन वाचकांपर्यंत येत आहे व प्रतिभासंपन्न लेखक घडत आहेत, असे प्रतिपादन साकिनाका पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर प्रदीप माने यांनी केले. मुंबईतील साकिनाका पोस्ट कार्यालयात चपराक प्रकाशन निर्मित व आशिष निनगुरकर लिखित 'अग्निदिव्य' या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात पोस्टमास्तर प्रदीप माने बोलत होते.



यावेळी पुस्तकाचे प्रकाशन कार्यालयीन सहकारी भूषण बेर्डे, महेश बहिरमल,रमेश कुमार,अक्षय मालकर, राजू रणवीर, सूर्यकांत देसाई, प्रवीण पवार, पोस्टमास्तर प्रदीप माने, लेखक आशिष निनगुरकर, अशोक अडसूळ, रचना शिर्के, विशाल मेढे, अतुल तिवारी व उदय भागवत यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. एक स्त्री व तिचा मुलगा अग्नि-तांडवातून कसे जातात, त्या महिलेची होणारी घालमेल त्यात तिचा होणारा छळ या गोष्टी पुस्तक वाचतांना बऱ्याच वेळेस अश्रू अनावर होतात. 'श्यामची आई' नंतर आवडलेलं हे पुस्तक असल्याचे सहकारी प्रविण पवार यांनी यावेळी सांगितले. हे पुस्तक वाचतांना एका स्त्रीचा लढा केवळ 'अग्नितांडव' न राहता तो 'अग्निदिव्य' कसा बनत गेला याची प्रचिती हेते. कारण पुस्तकाच्या या नावातच या पुस्तकाचा सर्व गाभा दडलेला आहे. एका मुलाची आंतरिक वेदना,एका महिलेचा आभाळाएवढा संघर्ष व समाजमन असे तीन टप्पे युवालेखक आशिष निनगुरकर यांच्या 'अग्निदिव्य' या चरित्रात्मक पुस्तकात आहेत. रमाबाई कांबळे यांचा जीवनप्रवास अतिशय खडतर होता तसेच त्यांच्या वाटेत प्रत्येकवेळी काटेच आले आहेत. तरी त्यांनी आत्महत्या न करता,प्रत्येक संकटाला झुगारून सर्व गोष्टींचा सामना केला.हार मानली नाही.अभिषेक व त्यांच्या आईचा जीवनपट किती काळीज फाडून दुःख देणारा आहे,हे पुस्तक वाचल्यावरच तुम्हाला कळू शकेल. संतोष घोंगडे यांनी उत्तम असे मुखपृष्ठ साकारले आहे. लागोपाठच्या संकटांनी तिच्या आयुष्याची परवड झाली. त्यातही ती खंबीरपणे उभी राहिली. संकटांशी दोन हात केले. आपल्या मुलासाठी संघर्ष केला. अनंत अडचणींवर मात केली. मुलाला अर्थार्जनासाठी सक्षम केलं. त्याच्या पायावर उभं केलं. एका आईचं कर्तव्य पार पाडलं. कुठलाही दोष नसताना, गैरसमजाच्या अग्निदिव्यातून जात तिनं एक महत्त्वाचा टप्पा गाठला. यात आपलं अस्तित्व, ओळख मात्र ती पार विसरून गेली तिच्या कष्ट-त्याग-समर्पणाचीच ही एक गाथा-गाथा अग्निदिव्याची.याच चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन उत्तमरीत्या संपन्न झाले.यावेळी कर्मचाऱ्यांनी 'वाचन चळवळ वाढवण्यासाठी' संकल्प केला व पुस्तक आदान-प्रदान उपक्रम सुरू केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल मेढे यांनी केले तर आभार सूर्यकांत देसाई यांनी मानले.

> लेखक आशिष निनगुरकर यांच्या लेखनात एक मोठी ताकद आहे . त्यांनी पुस्तकात मांडलेले वर्णन डोळ्यासमोर उभे रहाते .या पुस्तकाला वाचकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे व 'अग्निदिव्य' हे पुस्तक विक्रीचा तसेच पुरस्काराचा एक नवा विक्रम करेल हा विश्वास वाटतो .
> **घनश्याम पाटील, प्रकाशक , चपराक प्रकाशन पुणे**



# पूरबाधित क्षेत्रातील शासकीय जमिनीवरील नागरिकांचे अतिक्रमण नियमित होणार

## कहार समाज जिल्हाध्यक्ष इच्छैय्या यांच्या प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संतनगर तसेच ईतर पूर बाधीत क्षेत्रातील नागरिकांचे अतिक्रमण नियमीत करण्यात यावे अशी मागणी कहार समाज संघाचे जिल्हाध्यक्ष रघुनाथ इच्छैय्या यांनी पालकमंत्री संदीपान भुमरे यांना १२ डिसेंबर २०२३ रोजी नागपुर येथे हिवाळी अधिवेशनात निवेदनाद्वारे केली होती .पैठण शहरातील संत नगर भागात पूर बाधित क्षेत्रात अतिक्रमण करून रहात असलेल्या कहार, भिल्ल, भोई समाजातील तसेच इतर नागरिकांचे अतिक्रमण पूर बाधित क्षेत्रात येत असल्याचे कारण पुढे करून त्यांची शासकीय जमिनीवरील घरे, अतिक्रमण नियमित करण्यास जिल्हाधिकारी यांनी नकार दिला होता व त्यांचे प्रस्ताव रद्द करण्यात आले होते. मात्र पैठण शहरात आपेगाव -पैठण विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून पूर बाधित क्षेत्रात कोट्यावधी रुपयांची कामे सुरू आहेत. आदी ठिकाणी सूरु आहेत .मग गरीब नागरिकांवर अन्याय काय केला जात आहे ही बाब रघुनाथ इच्छैय्या व रमेश लिंबोरे यांनी पालक मंत्री संदीपान भुमरे यांच्या निदर्शनात आणून दिली. ही बाब लक्षात येताच त्यांनी तात्काळ पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र जाधव यांच्याशी संपर्क साधून या संधर्भात चर्चा करून याबाबत कारवाई योग्य ती करण्याचे आदेश दिले. तसेच नगर परिषदचे मुख्याधिकारी संतोष आगळे यांना पैठण शहरातील पूर बाधित क्षेत्रातील अतिक्रमण करून राहणाऱ्या नागरिकांचे अतिक्रमणाचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे आदेश दिले. त्या नुसार मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी पैठण शहरातील संत नगर व इतर भागात पूर बाधित क्षेत्रात शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्या नागरिकांचे अतिक्रमण नियमीत करण्यासाठीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविले आहे. पालक मंत्री संदीपान भुमरे यांनी पैठण शहरातील संतनगर व इतर भागातील पूर बाधित क्षेत्रातील नागरिकांचे अतिक्रमण नियमित करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे आदेश दिल्याने त्यांचे कहार समाज संघ महाराष्ट्र राज्य जिल्हा अध्यक्ष रघुनाथ इच्छैय्या,रमेश लिंबोरे,चंद्रकांत कुलभैय्या, रमेश गव्हाणे, मोतीलाल घुंगासे, योगेश गव्हाणे, सचिन पांडव, गणेश भंडारी, रमेश पठाडे, मच्छिंद्र गव्हाणे, नितीन गव्हाणे, बद्रीनाथ घटे, प्रताप कुचे, सतीश गव्हाणे आदींनी केले आहे.

# चंद्रपूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रशांत विघ्नेश्वर, सचिवपदी प्रवीण बतकी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्रमिक पत्रकार संघाच्या आज दि. 17 जानेवारी रोजी पार पडलेल्या आमसभेत 2023-24 या वर्षासाठी नविन कार्यकारिणी निवडणूक पार पडली. यात चंद्रपूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रशांत विघ्नेश्वर यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष योगेश चिंधालोरे, सचिव प्रवीण बतकी, संघटन सचिव बाळू रामटेके, सहसचिव एजाज अली, कोषाध्यक्ष सुरेश वर्मा, कार्यकारिणी सदस्य रोशन वाकडे, प्रशांत देवतळे,प्रकाश देवगडे, सुनिल बोकडे, संदिप पाचभाई यांची निवड करण्यात आली.

निवडणूक अधिकारी म्हणून प्रा. डॉ . योगेश्वर दुधपचारे यांनी काम पाहिले. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे माजी अध्यक्ष संजय तुमराम, मजहर अली,आशिष अंबाडे, महेंद्र ठेमस्कर, पंकज मोहरील,देवानंद साखरकर, कमलेश सातपुते यांच्यासह संघाच्या सदस्यांनी अभिनंदन केले.



# सावळदबारा येथे नव्याने रुजू झालेले उपनिरीक्षक माळी यांचा प्रा. जीवन कोलते यांनी केला सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील आऊट पोस्ट पोलिस चौकी येथे दि २७/१/२४ फर्दापूर येथील पोलिस स्टेशनला नव्याने रुजू झालेले उपनिरीक्षक सुरेश माळी यांचा सावळदबारा येथे प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केला मोठा सत्कार फरदापुर पोलीस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेले पोलीस उपनिरीक्षक सुरेश माळी यांचे सावळदबारा जीवन कोलते पाटील मित्र मंडळ व स्वागत करण्यात आले याप्रसंगी गावातील अनेक मित्र मंडळ उपस्थित होते पोलीस पाटील विलास कुल्ली माजी सरपंच किसन सूर्यवंशी सामाजिक कार्यकर्ते गणेश खैरे, एकनाथ सपाटे, स्वानंद पाटील,मुंकुदा गायकवाड, उपसरपंच मोहम्मद आरिफ मो लुखमान,इतर गावकरी मित्र मंडळ उपस्थित होते यावेळेस परिसरातील सर्व भौगोलिक व इतर विषय सांगोपांग चर्चा होऊन माळी साहेबांचे स्वागत करण्यात आले गावातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार व संपादक गोकुळसिंग राजपूत रहीम पठाण सुनील चोरमले जब्बार तडवी व मित्र मंडळ उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी ज्ञानार्थी व्हावे : प्रा.डॉ.डी.एन. मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने आयोजित गेस्ट लेक्चर मध्ये प्रा. डॉ.डी.एन.मोरे बोलत होते. पीपल्स महाविद्यालय नांदेड इंग्रजी विभाग प्रमुख तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ.डी.एन.मोरे यांचे गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ.मोरे सरांनी भाषा, वाङ्मय आणि नवीन शैक्षणिक धोरण 20 20 च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी अध्ययन अध्यापन प्रक्रियेचा भाग झाले पाहिजे असे प्रतिपादन केले. त्याचबरोबर विद्यार्थी हा केवळ परीक्षार्थी न बनता तो ज्ञानार्थी बनला पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी केले. यामध्ये इंग्रजी विषयातील विविध संधी या संदर्भाने डॉ.जायभाये यांनी सुद्धा आपले मत मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मोरे सर विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य झाल्यामुळे त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डी.बी.कोरडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बी.ए.द्वितीय वर्षाचा विद्यार्थी रवी राठोड ने केले. यावेळी इंग्रजी विभागासह अन्य विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# शिवाजी बँकेचा 34 वा वर्धापन दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील गेल्या 33 वर्षांपासून शेतकरी व खातेदारांची पंसती आसलेल्या शिवाजी नागरी सहकारी बँक ने विविध सुविधा खातेदारांना उपलब्ध करून देत नेहमीच वाढीव लाभांश वाटप करुन ग्राहक संख्या वाढीत आग्रेसर राहीली आहे. यावर्षी बँकेचा 34 वा वर्धापनदिन बँकेचे चेअरमन रविंद्र काळे यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हरिपंडीत गोसावी (व्हा.चेअरमन) संचालक भाऊसाहेब औटे, रामचंद्र काळे, पृथ्वीराज चौहान, सतिष बलदवा, शंकरराव राऊत, दशरथ सोनवणे, पाशा धांडे,अशोक जाधव, सौ.ज्योती खांडेकर, सौ.तनुजा जाधव, अँड. किशोर वैद्य, एन.व्हि शर्मा (C.A) डी.पी मोहीते, अरुन नरवडे, दत्तात्रय फटागडे, गणपत म्हस्के, संतोष राऊत, सदाविजय पोशनगिर, रत्नदिप मुळे, जगदीश गोर्डे, कृष्णा काकडे, ईश्वर ढोकळे, दत्ता मोरे, बाळासाहेब दसपुते, पवन काळे, सौ.सुभद्रासोडंगे, सौ.रेवती, रांजनिकर, फौजदार जाधव, भाऊसाहेब कणसे, अबेद पठाण अशिष पवार व सभासद व ग्राहकांची उपस्थित होती.

# साखरखेर्डा येथे कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** श्रीराम जन्मभूमी आयोध्या येथे श्री रामचंद्र यांचे प्राणप्रतिष्ठा व मंदिराचे उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा येथे २० जानेवारी ते २३ जानेवारी पर्यंत साखरखेर्डा येथील पुरातन मंदिर असलेले श्रीराम मंदिर येथे भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, शनिवार २० जानेवारी रोजी सकाळी , ५. ४५ ते ७ काकडा आरती, सकाळी ८ . ते १० अभिषेक कलश यात्रा व यज्ञाला सुरुवात , दुपारी १२ ते १२ . ३० नैवैदय व आरती , दुपारी 3 ते ४ अखंड नामस्मरण श्रीराम रक्षा पठण, सायं . ६ ते ८ मातोरी स्त्रोत उपासना व आरती, रात्री ८ ते १० स . भ श्री सर्वेशजी शुक्ल हिंगोली
- रविवार 21 जाने . सकाळ ५.४५ - ७ काकडा आरती, सकाळी ८ ते १० ,अखंड नामस्मरण, पवमान अभिषेक, यज्ञाला सुरुवात , १२ ते १२ . ३० नैवैदय आरती , दुपारी ३ ते ४ अखंड नामस्मरण व सामूहिक श्रीराम रक्षा पठण , सायंकाळी ६ ते ८ मारोती स्त्रोत व उपासना व आरती, रात्री ८ ते १० स . भ . श्री . मंगेशजी हिवरेकर जालना यांचे किर्तन, - दि . २२ जाने . सोमवार , सकाळी ५ . ४५, ते ७ पर्यंत काकडा आरती , सकाळी ८ ते १० नामस्मरण व पुर्णाकृती यज्ञाला सुरुवात , प्रवचन , स . भ . श्री . मंगशजी हिवरेकर जालना , दुपारी ११ ते १२ . ४५ L E D स्क्रीनवर अयोध्या वरून श्रीराम प्राणप्रतिष्ठा थेट प्रक्षेपण दाखविण्यात येईल, मंगळवार दि . २ ३ जाने . सकाळी ५ . ४५ ते ७ काकडा आरती, दैनंदिन कार्यक्रम , दुपारी २ ते रात्री ८ पर्यंत भव्य महाप्रसाद वाटप ,तरी सर्व नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीराम उपासना मंडळ, प . पू . श्री प्रल्हाद महाराज संस्थान व सर्व सकल हिंदू समाजबांधव साखरखेर्डा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# 'मसाज-स्पा सेंटर'च्या नावावर देहव्यापार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** खामला परिसरात 'अमनजेना स्पा-मसाज सेंटर'मध्ये अचानक ग्राहकांची गर्दी वाढायला लागली. तेथे तरुणींसह अल्पवयीन मुलीसुद्धा यायला लागल्या. त्यामुळे संशय आल्यामुळे गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून स्पा-मसाज सेंटरच्या नावावर सुरु असलेल्या सेक्स रॅकेटवर छापा घातला. पोलिसांनी देहव्यवसाय चालवणाऱ्या ३ आरोपींना अटक करून त्यांच्या तावडीत सापडलेल्या ४ मुलींची सुटका केली. मनीषा उर्फ महिमा सुरेश फरकाडे (३५) रा. हिलटॉप, रामनगर, सरोज मनोज शर्मा (३८) रा. सोनबानगर, वाडी आणि नीलेंद्र महेश उके (३४) रा. कंट्रोलवाडी, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

या कारवाईमुळे लक्ष्मीनगर चौक ते आठ रस्ता चौकादरम्यान असलेल्या एका मसाज सेंटरमधील तरुणींनी दुपारीच पळ काढल्याची चर्चा आहे. मनिषा फरकाडे आणि सरोज शर्मा यांनी खामलाच्या सत्यसाई अपार्टमेंटमध्ये 'अमनजेना स्पा सेंटर' उघडले होते. एका नागरिकाने पोलिसांना फोन करून माहिती दिली. पडताळणीत ही माहिती खरी ठरली. चौकशीत वरील आरोपी पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यवसाय करून घेत असल्याचे समोर आले.

# हिट अँड रन कायद्याच्या विरोधात ऑटो रिक्षा बंद

आधुनिक केसरी न्यूज

**प्रेम गहलोत**

**चंद्रपूर :** हिट अँड रन कायद्याच्या विरोधात उद्या पासून दोन दिवस ऑटो रिक्षा बंद ठेवण्याचा निर्धार केला आहे. केंद्र सरकारच्या हिट अँड रन कायद्याच्या विरोधात येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक जुनी नगर परिषद जवळ वाहन चालक बेमुदत साखळी उपोषण ला बसले आहेत. वाहन चालक संयुक्त संघर्ष समिती बल्लारपूर च्या वतीने विरोध दर्शविण्याकरीता सर्व संघटनांच्या वतीने ऑटो रिक्शा, काळी-पिवळी, स्कुल बस, स्कुल वॅन, सुमो, खाजगी बस चालकांचा सहमतीने बंद करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थांना शाळेत जाण्याकरिता त्रास सहन करावा लागेल. तसेच प्रवाशांना सुध्दा याचा त्रास होईल. वंचित बहुजन आघाडी व वंचित बहुजन युवा आघाडी कडून संघर्ष वाहन चालक मालक संघटना बल्लारपूर साखळी उपोषण करण्याकरिता बसलेले चालक व मालक यांची सविस्तर रित्या भेट देऊन त्यांच्यावर केंद्र सरकारने लादलेला कायदा हा काळा कायदा असून ते रद्द करण्यात यावा. याकरिता त्यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला व केंद्र सरकारने आणलेला जुलमी कायदा रद्द करण्यात यावा याकरिता केंद्र सरकारच्या जाहीर निषेध नोंदविला व समस्त चालक व मालक यांना जाहीरपणे पाठिंबा देण्यात आला. यावेळी वंचित बहुजन युवा आघाडी बल्लारपूर तालुका अध्यक्ष अभिलाष चुनारकर, उमेश कडू कार्याध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बल्लारपूर, गौतम रामटेके, अश्विन शेंडे, सुदेश शिंगाडे, प्रशांत सातकर, स्वप्निल दुधे, दूरेश तेलंग, सरोज झाडे, धम्मपाल मून, मयूर लभाने, विश्वेश्वर आकनूरवार, सम्यक रामटेके, राहुल वाळके, सुहास दुबे, हर्षल भसारकर, अभी दुर्गे, गजू मडावी सह कार्यकर्ते उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर